प्रकरण ३ रे

# ‘अर्थ आणि अन्वयार्थ’ ग्रंथाचा स्तंभलेखनाच्या दृष्टीने विचार

# प्रकरण ३ रे

# 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथाचा स्तंभलेखनाच्या दृष्टीने विचार

## प्रस्तावना

गंगाधर पानतावणे हे मराठी साहित्यातील ज्येष्ठ अभ्यासू दलित साहित्यिक म्हणून प्रसिद्ध आहेत. दै. लोकसत्ता औरंगाबाद या वृत्तपत्रातून 'अर्थ आणि अन्वयार्थ' या शीर्षकाखाली त्यांनी वर्षभर स्तंभलेखन केले आहे. एकुण चौपन्न लेख असणाऱ्या या ग्रंथामध्ये पानतावणे यांनी वर्षभरात घडलेल्या घटनांचा आढावा घेतला आहे. पानतावणे आपल्या मनोगतामध्ये म्हणतात, ''अर्थशोध एक आव्हानच असतं परंतु हा अर्थशोध म्हणजे विचार प्रकटीकरण, मुक्त अभिव्यक्तीचा ध्यास याच ध्यासाने त्या घटनांचा, विचारांचा, सर्जनाचा, कलात्मकतेचा, सांस्कृतिक नि सामाजिक अंगाचा आणि अंतरंगांचा वर्षभर शोध घेत राहिलो, त्याचाच हा आविष्कार म्हणजे 'अर्थ आणि अन्वयार्थ.'

लेखकाची स्तंभलेखनामागची प्रेरणा लक्षात घेऊन अर्थ आणि अन्वयार्थ या ग्रंथातील प्रत्येक लेखाचा स्तंभलेखनाच्या दृष्टीने विचार येथे केला आहे. स्तंभलेखनाला आवश्यक असणारी लेखनाची वैशिष्ट्ये या सर्व लेखामध्ये ठळकपणे दिसतात. लेखामध्ये असणारे विषयाचे वैविध्य लक्षात येण्यासारखे आहे. स्तंभलेखनाला आवश्यक असणारी शब्दमर्यादा सांभाळताना लेखकाने आपले विचार कमीत कमी शब्दात बांधेसूदपणाने आणि रेखीवपणाने मांडले आहेत. नेमकी शब्द योजना हे पानतावणेंच्या स्तंभलेखनाची वैशिष्ट्ये आहेत. नुकतीच घडलेली एखादी घटना लेखकाला विचार प्रवण करते आणि त्या अनुषंगाने लेखक इतर संदर्भ देत आपले व्यक्तिगत विचार मांडत राहतात आणि त्या स्तंभलेखनाला एखाद्या वैचारिक लेखाचे संदर्भमूल्य प्राप्त होते. त्यांच्या प्रत्येक लेखामध्ये विषयाचा ताजेपणा जाणवतो. निवडलेल्या विषयाची ते सर्वांग परिपूर्ण माहिती देतानाच जाता जाता पडद्यामागचे तपशील ही देवून जातात.

मात्र लेखनात कोठे ही निष्कर्ष किंवा तात्पर्य देत नाहीत. वाचकाने ते स्वत: काढावी अशी त्यांची अपेक्षा असते. लालित्यपूर्ण पद्धतीने केलेले लेखन वाचकांशी सहज संवाद साधणारे असते. मात्र या सर्व लेखनामध्ये गंगाधर पानतावणे कोठेही आपल्या मताशी तडजोड करीत नाहीत. बुद्धीनिष्ठ, विज्ञानवादी, आंबेडकरवादी, पुरोगामी विचार ही पानतावणे यांची ओळख स्तंभलेखनात दिसून येते. याचा शोध 'अर्थ आणि अन्वयार्थ' मधील प्रत्येक लेखातून घेतला गेला आहे.

गंगाधर पानतावणे यांनी जे स्तंभलेखन केले आहे यामध्ये स्तंभलेखनाच्या दृष्टिकोनातून जे वैशिष्ट्यपूर्ण लेखन केले आहे ते खरोखरच वाचनीय आणि स्मरणीय असे आहे. सामाजिक, राजकीय, धार्मिक, क्रीडा, स्त्रीविषयक, सांस्कृतिक, वाङ्मयीन असे वैशिष्ट्यपूर्ण लेखन 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथामध्ये केले आहे. गंगाधर पानतावणे यांनी व्यक्ती, समाज आणि घटना या तिन्हीचा मेळ घालूनच वैशिष्ट्यपूर्ण असे लेखन केले आहे.

## 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथातील वैशिष्ट्यपूर्ण आशय सूत्र

गंगाधर पानतावणे यांनी स्तंभलेखनाच्या दृष्टिकोनातून वैशिष्ट्यपूर्ण असे लेखन केले आहे आणि म्हणूनच हे लेखन स्तंभलेखनाच्या पातळीवर महत्त्वपूर्ण असे ठरले आहे. घडणाऱ्या प्रत्येक घटनेविषयी सूक्ष्मपणे विचार करून अर्थ आणि अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे आणि प्रत्येक नाजुक आणि हळव्या विषयांना त्यांनी वेगवेगळ्या उदाहरणाद्वारे हाताळण्याचा प्रयत्न केला आहे. गंगाधर पानतावणे यांनी सामाजिक दृष्ट्या जे महत्त्वपूर्ण लेखन केले आहे ते पुढीलप्रमाणे.

गंगाधर पानतावणे यांनी स्तंभलेखनाच्या वैशिष्ट्यानुसार जे सामाजिक लेखन केले आहे यामध्ये  समाजामध्ये जी सत्य परिस्थिती आहे, त्याचे सूक्ष्म अवलोकन आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये केले आहे.

## सामाजिक वैशिष्ट्ये

### १) प्रायश्चित !

या लेखामध्ये २ मार्च १९३० रोजी काळाराम मंदिर सत्याग्रह झाला. नुकतेच या घटनेला ७५ वर्षे पूर्ण झाली. या दिवसाचे प्रायश्चित म्हणून पाच दलित दांपत्यांनी पूजा केली आणि पौरोहित्य केलेल्या सुधीरदास महाराजांनी त्यांनी आपले आजोबा रामदासबुवा यांच्या वतीने प्रायश्चित घेतले.

१९३० साली बाबासाहेब आंबेडकरांच्या अंगावर दगडफेक झाली. मंदिर प्रवेश नाकारला. तब्बल चार वर्षे हा लढा चालला. शेवटी आंबेडकरांनी धर्मच बदलला. पण तत्कालीन हिंदूंना पाझर फुटला नाही. आणि आज या धर्म मार्तंडांना प्रायश्चित घ्यावेसे वाटते.

पश्चाताप म्हणजे मनोबुद्धी केलेल्या चुकांची प्रांजळपणे कबुली म्हणूनच लेखक पश्चातापाला एक नवी दिशा म्हणतात.

लोकहितवादी, लोकमान्य टिळकांनी या धर्ममार्तंडाना प्रायश्चित घ्यायला भाग पाडले. दीडशे वर्षे सत्ता करणाऱ्या इंग्रजांना टिळकांनी सळो की पळो करून सोडले. पण ब्रह्मवृंदांसमोर टिळक नमले.

आजोबांनी केलेल्या चुकांचे प्रायश्चित सुधीर दासांनी घेतले पण लेखकाला सांगावयाचे आहे की अजुनही कित्येक मंदिरे प्रवेशाची वाट पाहताहेत. अधार गिळून टाकायला फार थोडा प्रकाश आपल्या हाती आहे.

## २) मूठभर मीठ

महात्मा गांधी यांनी मूठभर मीठासाठी सत्याग्रह केला. या घटनेला नुकतीच ७५ वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने एका राजकीय पक्षाने पुन्हा एकदा दांडी यात्रा काढली गांधी नसलेली दांडी यात्रा अशी काही जणांनी याची संभावना केली. पण दांडी यात्रा म्हणजे केवळ मीठाचा प्रश्न नव्हता ते आव्हान होते. जुलमी इंग्रजी सत्तेला आव्हान होतं आणि ते सुद्धा २४१ मैलाची पदयात्रा. पण ७५ वर्षांनी जेव्हा काँग्रेसने दांडी यात्रा काढली तेव्हा अनेकांना त्यात राजकारणाचा वाव दिसला. सोनियांच्या प्रभावासाठी हे प्रयोग असल्याचे म्हटले आहे. पण या निमित्ताने तरी गांधीजींचे स्मरण करत आहेत याचे भान पक्ष विसरत आहेत. नाहीतर गांधी फक्त शासकीय कार्यालयातच मिळतात. ही शोकांतिका सर्वांनी दूर करायला हवी. लेखकाने या लेखात महात्मा गांधींच्याबद्दल असलेली आदराची भावना व्यक्त केली आहे.

## ३) जातीच्या बेटावरील माणसं !

माणसाची जात नाही ती जात. भारतात तर अनेक जाती धर्माची माणसे आहेत. जात ही माणसाला जळवासारखी चिटकून राहते. या लेखात मुंबईत अपंगाचा व दुर्बल मनस्कांचा एक विवाह विषयक मेळावा झाला. यामध्ये लुळे पांगळे बहिरे अंध असे अनेक अपंग आले होते. या मेळाव्यात प्रत्येक आपल्याला आपल्याच जातीतील वधू वर हवेत अशी मागणी केली. ज्यात हात पाय नाहीत त्यानेही जातीच्याच मुलीची मागणी करावी. या लेखामध्ये गंगाधर पानतावणे यांनी एक उदाहरण दिले आहे. ''श्रीधरपंत समाजशास्त्राचे प्राध्यापक चांगले अभ्यासक ते ताडदिशी म्हणाले, 'अहो, आपण कसे जिवंत राहिलो याचा काही विचार करणारी नाही. मार्तंडराव आहे ही नेत्यांची मेहरबानी समजा की, त्यांनी आम्हाला ठार केलं नाही. त्यांनी ठार केलं असतं ना तर सगळ्या जाती नष्ट झाल्या असत्या आणि आपण सर्व एकाच धर्माचे आणि एकाच जातीचे राहिलो असतो.''

लगेच मार्तंडांनी पवित्रा घेतला, ''असं म्हणू नका आपल्या पूर्वसुरींनी जातीची मांडणी किती उत्तम केली आहे. जातीत जन्मायचं, जातीत विवाह करायचा आणि जातीतच मरायचं. जातीशिवाय देशाला काही अर्थ आहे का ? आपला विवाह आपल्याच जातीत केला की वंशवेल छान वाढते. धर्ममार्तंडांनी उगाच पुरस्कार केला नाही सजातीय विवाहाचा. आंबेडकर म्हणालेही 'Caste is a closed society.' जात म्हणजे बंदिस्त समाज.''

म्हणूनच लेखक जात म्हणजे बंदिस्त समाज हे आंबेडकरांचे वचन सांगू इच्छितात. माणसाला जन्मत: चिकटते ती जात ती मेल्यावरच जाते. या लेखात शुद्ध वंश, शुद्ध जात यावर लेखकाने टीका केलेली आहे. जातीपातीच्या संकल्पना समाजाला अधोगतीकडे नेताना दिसतात. सर्वधर्मसमभाव पाळावा म्हणणे व त्यात जात-पात करणे हे लेखकाला बेगडी वाटते.

## ४) अंधश्रद्धा

भारतात अंधश्रद्धा खूप खोलवर रूजलेली आहे. या लेखात दांभिकतेवर टीका केलेली आहे. भारतातून परदेशातही अंधश्रद्धा जास्त जाताना दिसते. तिकडे हे बाबा लोक संमोहनाच्या साहाय्याने स्त्रियांना वश करण्याचे पापही करतात. समाजाला अंधश्रद्धेच्या गर्तेत लोटणे हेच या बाबाचं काम.

यात्रेमध्ये होणारी पशुहत्या तर कितीही कायदे केले तरी टाळता येत नाही. निष्पाप प्राण्यांच्या हत्या या होतच राहतात. अंधश्रद्धा निर्मुलनाची उठाठेवी करतात.

या लेखात मांगीर बाबांच्या यात्रेमध्ये झालेली पशुहत्या, गळ टोचून घेण्याची विदारक पद्धत यांवर प्रकाश टाकला आहे. गळ टोचून घेताना जाणारे बळी, होणाऱ्या जखमा याकडे दुर्लक्ष करून समाजात अंधश्रद्धा पसरत आहेत. नालंदा विद्यापीठ परिसरात बुद्धांना तोलिया ढेलिया अशी नावेही दिली आहेत.

या सर्वांवरून एक लक्षात येते, आजच्या विज्ञान युगात मानव तितक्याच अंधश्रद्धा पाळत आहे. म्हणूनच लेखकाला माणूसच गिळून टाकणाऱ्या अंधश्रद्धा नेणार कुठे ? हा प्रश्न पडलेला आहे. समाजाला अंधारात नेणाऱ्या अंधश्रद्धा टाळायला हव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

असेच अंधश्रद्धेला बळी जाणारे उदाहरण द. ता. भोसले यांनी आपल्या 'पार आणि शिवार' या ग्रंथामध्ये दिले आहे. यामध्ये त्यांची मावशी आजारी होती आणि तिच्यावर डॉक्टरी औषधोपचार न करता तिच्या अंगात भूत शिरलय म्हणून एका भोंदू बाबाकडून तिच्यावर औषधोपचार

सुरू होते. तेव्हा लेखक मावशीला बघून घरी आल्यावर ते सांगतात, ''दुसऱ्या दिवशी मी परतलो. माझ्या व्यापात गुंतलो. बारा-तेरा दिवसांनी काकांच पत्र आल. कुणाकडून तरी लिहून घेतलेले. त्यात काकांनी कळविले होते म्हातारीच्या अंगात शिरलेले भूत काढण्यासाठी बाबांनी भुताला मारण्यासाठी म्हातारीलाच गुरासारखे ओल्या फोकानं बेदम ठोकले आणि मारातच तिने डोळे मिटले. उरले फक्त तिच्या नावाने काढलेले व बाबांसाठी खर्च केलेले कर्ज आणि त्याचे तीस टक्के अल्पदराचे व्याज.'' वरीलप्रमाणे द. ता. भोसले यांनी आपल्या 'अंधश्रद्धा' या लेखामध्येच याचे चित्रण केले आहे. यावरून आपल्या लक्षात येते की पूर्वीपासून ते आजपर्यंत आपल्या भारतीय समाजात अजुनही जीवघेणी अंधश्रद्धा दडलेली आहे.

## ५) प्रकाशन समारंभाचे कवित्व

या लेखामध्ये बाळासाहेब ठाकरे यांच्या फोटो बायोग्राफीचा सोहळा झाला त्यावर केलेले विवेचन आहे.

साधारण प्रकाशन सोहळा म्हटले की घरी, हॉलमध्ये, शाळेमध्ये, सभागृहात, शामियान्यात होतात. पण ठाकरे यांच्या छायाचित्रणाचा सोहळा राज ठाकरे यांनी 'गेट वे ऑफ इंडिया' वर घेतला. जी शिवसेना मराठी-मराठी म्हणून ओरडते तिला शिवाजी पार्क आठवला नाही. हे लेखकाच्या संवेदनशील मनाला खटकते. पण या कार्यक्रमाला तर वाजपेयी, शरद पवार, प्रमोद महाजन, लता मंगेशकर, बाबासाहेब पुरंदरे अशी नामवंत मंडळी होती. जणू काही राजकीय सोहळाच या ठिकाणी पार पडला. यावेळी झालेल्या भाषणामध्येही पवार, ठाकरे यांनी एकमेकाला कोपरखळ्या मारल्या.

हे सर्व पाहून लेखकाचे संवेदनशील मन निराश होते. वाजपेयी यांच्या भाषणाने तर साऱ्या प्रकाशन समारंभाचीच खिल्ली उडविली आहे.

## ६) सुनील दत्त नावाचा माणूस

सुनील दत्त या माणसाने आयुष्यात किती झंझावत्या वादळांना तोंड दिले याचे चित्रण या लेखात केले आहे. हिंदू मुस्लिम कुटुंबांना फाळणीने विभक्त केले व सुनील दत्त यांनी अखंड भारत पाहिलेला त्यांच्या चुलत्यांच्या शरीराचे तुकडे-तुकडे होताना पहावयास लागले. फाळणीच्या वेळी फक्त दंगलीच झाल्या नाहीत तर माणुसकीही भरपूर गेली. धार्मिक सहिष्णुता ही झिरपणाऱ्या रक्तासारखी असते.

याच सुनील दत्तांनी जेव्हा नर्गिसशी विवाह केला, तेव्हा हिंदू मुस्लिमांनी  नाके मुरडली होती. काहींनी तर नर्गिसच्या पूर्वायुष्यातील घटनांनी त्यांचे आयुष्यच उध्वस्त करण्याचा डाव रचला होता. पण काळाच आव्हानं स्वीकारत दोघांनीही वाटचाल केली. दोघांचाही कलेच्या आणि राजकारणाच्या क्षेत्रात गौरव झाला. पण जेव्हा त्यांच्या पत्नीला कॅन्सरचे निदान झाले तेव्हा दत्त सैरभैर झाले. तिच्या अंत्यसंस्काराच्या वेळी तर खूप प्रश्न पडला. दफन की दहन ? पण दत्त एवढेच म्हणाले, 'आपण नर्गिसचं धार्मिक स्वातंत्र्य कधीही नाकारलेले नव्हते.' असा हीरो दत्त होता.

या लेखातून लेखकाने एखाद्याच्या जीवनात आलेल्या घटनांचा मागोवा घेत हिंदू मुस्लिम कट्टरतेचा उपहास केला आहे आणि त्याचबरोबर धार्मिक प्रश्नांना मोठा विषय बनवण्याचा प्रयत्न केला आहे.

## ७) वर्षा ऋतुचं आगमन !

पाऊस ! मृग नक्षत्र सुरू झाले की आपण पावसाची आतुरतेनं वाट पाहतो. शेतकरी तर आतुरतेने आकाशाकडे डोळे लावून बसलेले असतात. चातकाप्रमाणे ते पावसाची वाट पहात असतात. मेघदूत तर ढगांशी संवाद साधतो तर तानसेनच्या गाण्यानं ढगही यायचे. मानवाच्या जीवनासाठी पाण्याचे महत्त्व अत्यावश्यक आहे आणि अशा अवस्थेत दुष्काळाच्या भयानं शिवकालातल्या एका कवीनं म्हटलं होतंच ना -

**काही मिळेना, मिळेना खायला**
**ठाव नाही रे, नाही रे, नाही रे जायला ।**
**हौस कैची रे कैची, कैची रे गायाला**
**कोठे जावे रे, जावे रे, जावे रे मागायला ।।**

पावसाच्या थेंबासाठी जडावलेली असोशी शब्दातीत असते. पाणी म्हणजे जीवन असं पूर्वसुरींनी म्हटलंय ते यथार्थच ! पण अशा पावसासाठी अनेक जण नवस करतात. देवापाशी गाऱ्हाणे गातात. नेपाळमध्ये तर शंभर स्त्रियांनी निर्वस्त्र नृत्य केले ते केवळ पावसासाठी. भारतातही बेडकाची मिरवणूक, 'उपडा तांब्या' अशा अनेक समजुती रूढ आहेत. 'पीकपाणी' या कवितासंग्रहात तर ग्रामीण भागातील पावसाच्या आतुरतेने केले जाणारे सर्व विधी इंद्रजित भालेरावांनी आपल्या 'पीकपाणी' या कवितासंग्रहात जगाला माहित करून दिले आहेत. बा. भ. बोरकरही आपल्या 'चित्रवीणा' कविता संग्रहात म्हणतात,

**'सरीवर सरी आल्या गं, सचैल गोपी न्हाल्या ग'**

पावसाच्या आगमनाची वाट पाहतात तशी पाऊस उघडण्याची वाट पाहतात. ज्यांची हातावर भाकरी असते त्यांना जसे पावसाशिवाय जगता येत नाही. तसे कामाशिवाय जेवताही येत नाही अशांची व्यथाही काही कमी नसते. कवी भीमसेन देठे यांनी तर झोपड्या उध्वस्त करणाऱ्या पावसाला शिवीच दिली आहे. इंदिरा संतही म्हणाल्या ना -

**बाई पाऊस पाऊस**
**गरिबीशी खेळे मस्ती**
**ओलीचिंब चिरगुटे**
**आणि घरात गळती**

तर दुसरीकडे आनंदाने बहरून गेलेले कवी रवींद्रनाथ टागोर पावसानं आर्द्र झालेला वारा अंगावर घेताना सुखावून जायचे. भिजलेल्या वनातील फुलांनी मोहरून यायचे. पावसाळी रात्र त्यांना सुन्न करायची.

**अंधाऱ्या रात्रीचे सारे प्रहर आज**
**कोणत्या सुरांनी मी भारून टाकू**
**कोणती भुरळ पडल्यामुळे मी आज**
**सर्व विसरून**
**व्याकूळ झालो आहे**

वरील प्रमाणे गंगाधर पानतावणे यांनी पावसामुळे होणाऱ्या समाजाची सर्व स्थिती आपल्या लेखात मांडलेली आहे आणि त्याचबरोबर लेखकाने समाजाच्या दोन्ही बाजूंचा परिचय करून दिली आहे.

## ८) दुःखमुक्तीची प्रकाश पावले

या लेखात डॉ. सिद्धार्थ जोंधळे यांच्या 'एड्स' विषयक संशोधनावर विवेचन केले आहे. आजकाल कोणीही उठतो मी 'एड्स' पूर्ण बरा करून देईन अशी वल्गना करतो. एखादा पाद्री येऊन येशूच्या नावाखाली समाजाला भुलावत असतो. आपल्यातही पैठणच्या मधुकर महाराज विष्णू यांनी सहस्त्रनामाचा जप केला, त्यांना काही डॉक्टर्सनी साथ दिली.

मानवजातीच्या कल्याणासाठी त्यांनी केलेला जप असला तरी त्यांनी प्रतिज्ञा केली की या यज्ञानं 'एड्स' मुक्ती नाही झाली तर आपण कायम अंधश्रद्धानिर्मूलनाचे काम करू. 'एड्स' वर इतके संशोधन होत असताना अशी विधाने हास्यास्पद आहेत. पण याच वेळी नांदेडच्या डॉ. सिद्धार्थ जोंधळे यांनी प्रयोगशाळा उभारून याविषयी संशोधन सुरू केले आहे. त्यात त्यांना यश ही मिळाले आहे. ती औषधे त्यांनी विविध प्रयोगशाळेत पाठवली आहेत.

या लेखावरून गंगाधर पानतावणे यांनी एखाद्या घटनेकडे पाहण्याचा अंधश्रद्धाळूपणा कितपत असावा हे दाखवून दिले आहे व यातूनच त्यांची विज्ञाननिष्ठ दृष्टी ही दिसून येते.

## ९) अरे, शांघाय! शांघाय !!

काही दिवसापूर्वी पंतप्रधान मनमोहनसिंग यांनी मुंबईला शांघाय बनवण्यासाठी चर्चा केली तेव्हा अनेक प्रश्न निर्माण झाले त्यावरील चर्चेचा ऊहापोह करणारा हा लेख आहे.

मुंबई ही महामायानगरी पठ्ठे बापुराव पासून आण्णाभाऊ साठे पर्यंत प्रत्येकाला वेगवेगळी वाटते. मुंबईने सर्वांना सामावून घेतले आहे. मराठी माणूस तर मुंबईत शोधावाच लागतो. अशा या मुंबईचे शांघाय करावयाचे वाटले तर किंवा ठरवले तर कारखान्याचे जाळे उभ करावे लागेल. प्रशस्त रस्ते, भुयारी मार्ग, उड्डाण पूल, उच्च दर्जाच्या नागरी सोयी, झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन असे अनेक प्रश्न आहेत.

या सर्वांच्या अगोदरच पठ्ठे बापूराव गाव सोडून मुंबईत आले तेव्हा मुंबईला त्यांनी दुसरी लंकाच म्हटले आहे. ते मुंबईचे वर्णन करताना म्हणतात,

**मुंबई ग नगरी बडी बाका**
**जशी रावणाची दुसरी लंका**
**डंका चहुमुलखी राहण्याला गुलबाची कुलडी**

पठ्ठे बापूराव म्हणतात मुंबई आपलं वैभवच हरवून बसलेली आहे तर दूसरी मर्ढेकरांना मुंबईच्या बंदराने मोहवून टाकले आहे. ते म्हणतात,

**न्हालेल्या जणू गर्भवतीच्या**
**सोज्वळ मोहकतेने बंदर**
**मुंबापुरीचे उजळत येई**
**मधामधली प्रभात सुंदर**

प्रत्येक कवीला ही मुंबई वेगवेगळी वाटली तर अण्णाभाऊ साठे यांना ही मुंबई जशी चांगली वाटली तशी विद्रुपही वाटली. ते म्हणतात मुंबईत माणसांची वेदना, आगतिकता, लाचारी जगते. जगण्यासाठी माणसं झुंजतात पशुत्व स्विकारतात म्हणूनच अण्णाभाऊ साठे पुढे म्हणतात,

**इथं माणसाला माणूस खातं**
**लुटतं आणि लुटल्या जातं**
**तीस लाख लोक एका जागी राहती**
**भडकून उठती आधीमधी दंगेखोर होऊन**
**कधी आपसामध्ये करून गर्दी मुडदे पाडती**

अशा प्रकारे वर्णन केलेल्या मुंबईचे जर शांघाय करायचे म्हटले तर शांघाय हे उद्योगाची महानगरी आहे. उत्पादन कारखान्याचं जाळं आहे. संपत्ती निर्माण करणाऱ्या या शहरात श्रमिकांच्या श्रमाला प्रतिष्ठा दिली. शांघाय आधुनिक, स्वच्छ, सुंदर, भव्य आहे.

मुंबई ही भव्य असली तरी नंतर मुंबईतील अनेक गिरण्या, कारखाने बंद पडले. कामगार पोरके झाले. हिंसाचार वाढला. अन्न आणि निवाऱ्याला लोक मुकली गेली. शांघाय बनवण्याच्या नादात अनेक नवीन कृती आखल्या गेल्या.

याबरोबरच मुख्यमंत्री अंतुले यांनी झोपडपट्ट्या हटविण्याची घोषणा केली पण लगेच नेत्यांचा हस्तक्षेप. राजकीय उदासीनता हटल्याशिवाय मुंबईचे शांघाय होणार नाही आणि हे करताना सामान्य माणूस कराच्या ओझ्याखाली दबणार नाही याची ही काळजी घ्यावी लागेल.

लेखकाने या लेखात सामाजिक, राजकीय, भौतिक गोष्टींबरोबरच भावनिक प्रश्नांवरही प्रकाश टाकलेला आहे.

याउलट विजय तेंडुलकरांनी आपल्या 'कोव्हळी उन्हे' या ग्रंथामध्ये 'थोडी मुंबई प्रशस्त' या लेखात त्यांनी मुंबईमध्ये एक अनाथ मूल दत्तक घेण्यासाठी त्यांनी घातलेल्या अटी जगावेगळ्याच होत्या. त्यात त्यांना मूल हिंदूच हवे होते. त्यावर त्या गृहस्थांना हवे तसे मूल मिळणे कठिण आहे. त्यावर असे कचेरीतल्या बाई म्हणाल्या त्यावर तो गृहस्थ म्हणाला मुंबईत वाटेल इतकी अनाथ मुले आहेत. आपल्याला हवे तसे मूल मुंबईत मिळेल असे त्याला वाटले.

पण त्या सज्जन गृहस्थांची त्याची परळी इष्टमित्रांनी करून दिलेली मुंबई विषयीची कल्पना अतिशयोक्तीची असेल पण ही अशी का असावी ? आणि म्हणूनच विजय तेंडुलकर म्हणतात,

"उद्योगधंद्याचे मोठे केंद्र, फार मोठी व्यापारी पेठ, अद्यावत भव्य मोठे बंदर, आठरापगड जाती धर्माचे वसतीस्थान सुंदर आणि अति भव्य शहर ही मुंबईची जागतिक ख्याती आम्ही आजवर ऐकत होतो. छोट्या छोट्या अनाथ मुलांचे आगर ही नवीन ख्याती आता ऐकायला मिळाली.

मन कसे विषादाने भरून गेले आहे." यावरून मुंबईचे शांघाय झाले तर सामान्य माणसाचं काय होईल याची प्रचिती येते.

## १०) 'माणूसकीला मरण नाही'

या लेखामध्ये पावसाळा सुरू झाला. बघता बघता वाढत गेला आणि पावसाचे पाणी झोपडीत, घरात, बंगल्यात शिरू लागले. म्हणून 'पाऊस खरा समतावादी' असे लेखक म्हणतात. पावसाच्या या थैमानात शेकडो लोकांचे प्राण गेले. जनावरे मरुन पडली. घरे कोसळली. पण लेखकाला जाणवले की इथं माणुसकी अजून जिवंत आहे. हे सिद्ध करणाऱ्या काही बोलक्या घटना मुंबईत घडल्या. धर्म, जात पंथ यांच्या पलीकडे जाऊन सामान्य लोकांनी एकमेकांना मदत केली, प्राण वाचविले हाच अनुभव पुण्यामध्ये आणि सांगलीतही आला.

वरीलप्रमाणे सर्वच ठिकाणी पावसाने हाहाकार मानवला होता पण माणुसकी अजुन जिवंत आहे. माणुसकी जातीधर्माच्या पलीकडे असते. अर्थात माणुसकीला कलंक ठरणाऱ्या घटना घडत नाहीत असं नाही पण अंधार असतो तसा प्रकाशही असतोच ना ? याउलट जया बच्चनसारखी खासदार असणारी सुजाण नागरिक माझा पती पावसाच्या तडाख्यात अडकून पडलाय. सतरा तास आंघोळ करायला मिळाली नाही. केंद्र व महाराष्ट्र सरकार निष्क्रिय अशा म्हणतात.

प्रत्येक जण जीवाच्या पलीकडे जाऊन पुरात सापडलेल्या लोकांसाठी मदतीचा हात पुढे करत होते. लहान मुलांपासून ते वयस्क वृद्ध, वेगवेगळ्या क्षेत्रातील लोक या सर्वांनी यावेळी माणुसकी जिवंत असल्याचा प्रत्यय दिला. भावना आणि कर्तव्य एकत्र नांदत नाहीत असे का म्हणतात कुणास ठाऊक ? कारण मुंबईत भावना आणि कर्तव्याला हातात हात घालताना पाहिलंय. माणुसकीचे गडद-गहिरे अनुबंध पाहिले. तरीसुद्धा दुसरीकडे लोकांना मदत करायची सोडून महेश भट्ट, कायदेतज्ज्ञ मेमन सारखे उच्चभ्रु लोक सरकारला कोर्टात खेचण्याची भाषा बोलतात. या विरोधाभासाच्या तुलनने स्वत:चे प्राण संकटात घालून इतरांना मदत करणाऱ्या समाजसेवी व्यक्तींची लेखकाने दिलेली उदाहरणे ठळकपणे नजरेत भरतात आणि या लेखात समाज चिंतनाचे एक वेगळे परिमाण प्राप्त होते.

## ११) क्रांतीचं पाऊल

भारतात अजुनही अमानुष प्रथा सुरू आहेत. जातीवर आधारित समाज व्यवस्था व या व्यवस्थेने खालच्या जातीतील लोकांना आपल्या अस्तित्वासाठी, जगण्यासाठी, उदरनिर्वाहासाठी रात्रंदिवस कष्ट करावे लागतात. कोलकत्याला महान परंपरा आहे. अनेक उत्तुंग व्यक्तिमत्त्वे इथे जन्माला आली. देशाला समाजप्रबोधनाचा ज्ञानाचा वसा घालून दिला. त्याच कोलकत्यातील अज्ञानी दारिद्रयात खितपत पडणाऱ्या अनेक जीवांना आपल्या पोटासाठी पायरिक्षा ओढाव्या लागतात. या रिक्षा चालकांना रिक्षा ओढताना होणाऱ्या मरण यातना भयानक असतात. रिक्षात कोण बसले आहे ? कुठे जाणार ? किती पैसे देणार ? रिक्षा रस्त्याने ओढताना कुणाला धक्का लागला तर या आणि अशा अनेक वेदना व व्यथांची जाणीव राज्यकर्त्यांना नव्हती.

या पायरिक्षा चालकांच्या दु:खाची कष्टाची जाणीव झाली ती सदृश्य असणाऱ्या व ज्यांच्या नावातच बुद्ध असणाऱ्या बुद्धदेव भट्टाचार्यांना. त्यांनी एक क्रांतीकारी निर्णय घेतला. तो या रिक्षा बंद करण्याचा. वर्षानुवर्षे मानवाला मानवानं वाहून नेण्याची प्रथा बंद करून एक वेगळी सामाजिक क्रांती घडवून क्रांतीचं पाऊल उचलले. या रिक्षा चालकांसाठी व त्यांना स्वयंचलित रिक्षा चालवण्यासाठी, त्यांच्या भविष्याच्या आर्थिक तरतुदीसाठी निर्णय घेतला. या लेखात लेखकांनी समाज व्यवस्थेतील पारंपारिक व्यवस्थेतील व्यंगावर प्रकाश टाकला आहे व एका चांगल्या निर्णयाचे कौतुक केलेले दिसते.

## १२) सामाजिक पारतंत्र्याचा जाहिरनामा

संशय आणि सत्य यामध्ये कायम विरुद्ध दिशा असते. स्वराज्य हा ज्यांच्या शब्दकोशातील अंतिम शब्द होत त्या लोकमान्य टिळकांना त्यांच्या अनुयायाने विचारले होते. 'आपण ब्रिटीशांशी लढतो आहोत राजकीय स्वातंत्र्यासाठी. या देशातील कोट्यावधी लोक सामाजिक पारतंत्र्यात जखडबंध आहेत. त्यांना सामाजिक स्वातंत्र्य नाही. तेव्हा ते त्यांना केव्हा मिळणार ?' या लोकमान्य टिळकांनी गंभीरपणे सांगितले होते, 'एकदा आपल्या देशाला राजकीय स्वातंत्र्य तर मिळून द्या. मग आपल्या देशातील सामाजिक प्रश्न चुटकीसरशी सुटतील.'

लोकमान्य टिळकांचा आशावाद आज मात्र कुठे दिसत नाही. मनुने लिहून ठेवलेले शास्त्र आजही गरीब दलितांचा पिच्छा पुरवत आहे. लेखकाने सामाजिक सत्य मांडताना हरियाणातील गोहाना गावात घडलेल्या घटनेकडे लक्ष वेधले आहे. संशयावरून साठ दलितांची घरे जाळली.

जाट समाजातील एकाच्या खुनाच्या संशयावरुन, दलितांवरील संशयावरून दलितांची घरे पेटवली गेली. दुसरी घटना अकोला जिल्ह्यातील बेलखेडची. पोळा या सणादिवशी दलितांनी आपल्या सजवलेल्या बैलांना गावातील दत्तमंदिराजवळ नेले. हा त्यांचा अपराध बैलांच्या तिथे जाण्याने मंदिरचे पावित्र्य नष्ट होईल या संशयाने बेलखेडच्या पंचवीस दलितांची घरे जाळली. मनुस्मृतीमध्ये अस्पृश्यांच्या बद्दल काही नियम सांगितले आहेत. त्यांनी गावाबाहेर राहावे. मेलेल्या माणसांची वस्त्रे वापरावीत. फुटलेल्या भांड्यात जेवावे असे अनेक अमानवी नियम त्यांनी राबविण्या-साठी आजही आग्रही असतात. महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर, साने गुरूजी यांनी केलेले सत्याग्रहाचे विस्मरण होताना दिसते.

लेखकाने पसायदानाचा संदर्भ देताना असे सुचवले आहे की देशातील माणसांना मानसिक आणि सामाजिक पारतंत्र्यातून मुक्त व्हायला हवं ना ! या त्यांच्या विचारावरून एक वेगळा विषय मांडण्याबरोबर तत्कालिन संदर्भाद्वारे त्यांनी एक सामाजिक वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## १३) मुकी मेंढरे कुणीही हाका ?

कवी केशवसुत अत्यंत संवेदनशील कवी त्यांनी लहान मुलांना त्रास देणाऱ्या शिक्षकांवर व्यंग्यात्मक काव्यरचना केली. यामध्ये त्यांनी मुलांना झोडपणाऱ्या शिक्षकाला 'खाटिकाची' उपमा दिली. मुलं ही आज्ञाधारक असतात. शिक्षकांनी दिलेली शिक्षा आपल्या चांगल्यासाठीच असते. परंतु राजकारणी लोकांच्यामुळे सामान्य जनतेला व लहान मुलांनाही त्रास होतो. उत्तरप्रदेश सरकारने गांधी जयंती साजरी करण्याचे ठरवले. कार्यक्रमासाठी खासदार अमरसिंह व अभिनेत्री जयाप्रदा यांना बोलवण्यात आले. परंतु हे पाहुणे चार तास उशिरा आले. तोपर्यंत ही शाळेतील मुलं वाट पहात उन्हात ताटकळत होती. त्यातील चाळीस मुले अपघाताने कोसळली. दवाखान्यात नेण्यात आले. परंतु तेथेही कर्मचारी, औषधे नाहीत. पालक, शिक्षक व कर्मचारी पाहुणे येत नाहीत म्हणून हवालदिल.

एक वाजता पाहुणे आले. आल्याबरोबर त्यांना झाला प्रकार कळाला. कार्यक्रमाच्या ठिकाणी येऊन आपल्या उशिरा येण्याची कारणे सांगितली. भावनाशुन्य असणारे संयोजक पाहुण्यांची सरबराई करण्यात गुंतले होते. तर पाहुणे उन्हात बेजार झालेल्या या चिमुकल्या जीवांना उपदेशांचे डोस पाजत होते. अमरसिंह म्हणाले, 'विद्यार्थी हे उद्याच्या समृद्ध भारताचे शिल्पकार आहेत. यातूनच विद्यार्थी डॉक्टर्स होतील, इंजिनियर्स होतील, कृषीतज्ज्ञ होतील.' लेखकाने तत्कालीन संदर्भ देत राजकारण्यांचा मुर्दाडपणा उपहासात्मक भाषेत व्यक्त केला आहे.

## १४) जळो जिणें लाजिरवाणे !

माणसाचं जीवन चिंताग्रस्त बनलेले आहे. कमालिची असुरक्षितता, वाढलेल्या प्रचंड गरजा व त्यांची पुर्तता न झाल्याने येणारे मानसिक व भावनिक दौर्बल्य व त्यातुन आगतिक व दुबळी बनलेली मानसिकता व त्यातून भ्रमिष्टता या सर्वांतून मार्ग काढण्यासाठी अथवा पळवाट शोधण्यासाठी किंवा मनाला गुंतविण्यासाठी असुरक्षितता शोधण्यासाठी एखादा बुवा, महाराज, महंत, तांत्रिक, साधू यांच्या नादाला लागतात. वाहून जातात. त्यांच्या पायाशी लीन होतात. ते महाराज तत्सम लोक यांच्या असाहाय्यतेचा गैरफायदा घेतात व कित्येकांचे जीवन उध्वस्त करतात. शीलाचा बाजार मांडतात. शीलभ्रष्ट होऊन स्त्रिया गप्प बसतात. एखाद्या महिलने त्याविरुद्ध तक्रार देण्याचा प्रयत्न केलाच तर तिला भयानक त्रास दिला जातो. या भोंदू महाराजांचा शिष्यगण अडाणी तसेच उच्चशिक्षित व राजकारणी लोकांनी युक्त असतो. विज्ञान युगात वावरत असतानाही महाराजांच्या चमत्कारावर विश्वास ठेवून त्यांच्या आहारी जातात. आपण लुटले गेलो आहोत हे फार उशिरा लक्षात येते.

अनेक महाराज व तांत्रिक बिंग फुटल्यावर त्यांची अवस्था कशी होते व भक्तांचा भ्रमनिरास कसा होतो हे लेखकाने या लेखामधून मांडताना सामाजिक अंधश्रद्धेचा बुरखा फाडला आहे. या महाराजांचे मठ, आश्रम म्हणजे नितिमत्तेला उध्वस्त करणारी ठिकाणे आहेत. लेखकाने तुकारामाच्या आंतरिक दु:ख भावनेचा संदर्भ दिला आहे. अचारभ्रष्ट, दांभिक दुर्जनांच्यामुळे झालेले दु:ख व समाजाच्या यातना पाहून तुकाराम महाराज म्हणतात,

**बुडती हे जन न देखवे डोळा**
**येतो कळवळा म्हणुनिया ।**

## १५) ग्रामस्वराज्याचे स्वप्न

आनंद, सुख, सुआरोग्य इ. शब्द ज्यांच्या जीवनास स्पर्श करीत नाहीत अशा आदिवासींना दीपोत्सवाचे महत्त्व ते काय असणार ! जिथं एक वेळ अन्न मिळण्याची मारामार असते त्या आदिवासींच्या दु:खांना, समस्यांना तोटाच नाही. उपासमारी, कुपोषणाने व अंधश्रद्धेच्या दृष्ट चक्रात सापडलेल्या आदिवासींच्या दु:खाला काही सीमाच नाही. त्यात भरीस भर म्हणून अल्पवयात होणारे विवाह. नंतर जन्माला येणारी कुपोषित मुलं व्यंग्य, विकृतीच घेऊन येतात. मुलं जन्माला येणं हे त्यांच्या दृष्टीने 'देवाचं लेणं' मानल जातं. विकृती, व्यंग, कुपोषण व अनेक आजारांनी ही मुलं

मृत्युला कवटाळतात. अनेक आजारांनी महाराष्ट्रात एक लाख वीस हजार बालमृत्यू होतात असे समाजसेवक अभय बंग म्हणतात. ज्या आदिवासीयांचा दु:खाचा प्याला कधी संपतच नाही अशा आदिवासींच्या विकासासाठी, सुधारणांसाठी काही महान व्यक्तींनी आपलं सर्वस्व वाहिलं पण तरीही जेवढा विकास वा सुधारणा होणं अपेक्षित होतं तेवढ्या होऊ शकल्या नाहीत. त्यांच्यापर्यंत शासनाच्या योजना पोचत नाहीत. राज्यकर्त्यांनीही त्यांचाकडे कानाडोळा केला. नकली सहानुभूती ही मंडळी दाखवितात. बाकी शुन्यच. ग्रामस्वराज्याचे स्वप्न पहात असताना आपल्या या आदिवासी बंधुंना मुख्य प्रवाहात घ्यायला हवं असे मत लेखक इथं मांडताना दिसतात.

ज्या दिवशी भारत कुपोषण मुक्त होईल तोच दिवस खऱ्या दीपोत्सवाचा असेल. असा आशावाद लेखकाने व्यक्त केला आहे. सदरचा लेख दुर्लक्षित समाजाचे प्रतिबिंब दाखवणारा आरसा वाटतो.

## १६) सीमावासीयांचा संघर्ष

मुंबई, बेळगाव, निपाणी, भलकी, कारवार सह महाराष्ट्राचे स्वप्न संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक कार्यकर्त्याने पाहिले होते. त्यासाठी रणकंदन कैक जीव कामी आले. संयुक्त महाराष्ट्राच्या श्रेयासाठी धडपडणाऱ्या कुठल्याही पुढाऱ्याने नंतर या प्रश्नात लक्ष घातले नाही. या लोंबकळत राहिलेल्या प्रश्नाची झळ सहन करावी लागते ती सीमा भागातल्या मराठी जनतेला. ती जनता आजही म्हणजे आमच्या प्रिय महाराष्ट्र देशी जावू तोच दिवस आम्हाला सणासुदीचा असेल. तीच आमची दिवाळी असेल. तोच आमचा आनंदोत्सव असेल.

कर्नाटकातल्या नेत्यांनी सीमावासीय मराठी जनतेचा अनन्वित छळ केला. नोकरी देताना 'भूमीपुत्रांनाच न्याय' या नावाखाली मराठी जनतेला डावलले. पण याला प्रादेशिक अहंकार असे कोणी म्हटले नाही.पण हीच भाषा मुंबईत झाली की लोकांना भारतीय एकात्मकता आठवते. यामुळे संपूर्ण मुंबई परप्रांतीयांनी बळकावली आहे. आणि सन १९५६ या दिवशी कर्नाटकाच्या सत्ताधाऱ्यांनी बेळगाव कारवार बिदरचा मराठी भाषिक प्रदेश कर्नाटकात ओढून नेला. तेव्हापासून जखम भळभळते आहे आणि म्हणून १ नोव्हेंबर हा दिवस 'काळा दिवस' म्हणून पाळला जातो.

एकीकडे सीमावासीय मराठी बांधवांचा प्रश्न आणि दुसरीकडे मुंबईतल्या परप्रांतीय असा मागोवा. खरं तर महाराष्ट्र आणि मुंबई असा दुजाभाव कधीच झाला नाही. परप्रांतियांचा छळ आणि दु:स्वास कधी केला नाही. सगळ्यांनाच सारख्या सावलीन आश्रय दिला.

गंगाधर पानतावणे मुंबई विषयी म्हणतात, 'खरं तर मुंबई हे सात बेटांचे शहर. केवळ कोळ्यांच्या वस्तीचं. इंग्रज आले आणि त्यांनी मुंबईचा चेहरामोहराच बदलून टाकला. उद्योग नगरी म्हणून विकास केला. त्यापाठोपाठ कला, विज्ञान आणि रंजनभूमी म्हणून मुंबई प्रतिष्ठित झाली. आणि काय आश्चर्य, महाराष्ट्राबाहेरच्या प्रातीयाचं आधारकेंद्र मुंबई झालं. उदरनिर्वाहाची हमी म्हणजे मुंबई हे समीकरण झालं.'

परप्रांतीय आणि सीमावासीयांचा मागोवा घेताना आचार्य अत्रे, नानासाहेब गोरे, श्रीपाद अमृत डांगे, एस्. एम. जोशी, शहीर अमर शेख, यांचे योगदान नोंदविले आहे. त्यापूर्वी १९४६ ला डॉ. आंबेडकरांनी संयुक्त महाराष्ट्राला दर्शविलेला पाठिंबा लेखकांनी नोंदविला आहे.

## १७) घर देता का घर ?

शिरवाडकरांच्या नटसम्राटाने बेधुंदपणे कला, वैभव भोगले पण व्यवहाराच्या पातळीवर तो शुन्य ठरविला. आजची नवीन पिढी ही साहेबी संस्कृतीत वाढलेली आहे. जुन्या पिढीविषयी त्यांच्यामध्ये अनास्थाच जाणवते. या लेखात प्रा. रा. ग. जाधव यांच्या स्वतःच्या घराविषयीचा वृत्तांत सांगितला आहे. अनपट बिल्डींगमध्ये शेवटच्या माळ्यावर पाय पुरतील एवढ्या छोट्या खोलीत सुखासमाधानाने आयुष्य व्यतीत केले. पत्नीवियोगाचे दुःख सारून मराठी साहित्य साधना संपन्न केली. चहा, सिगारेट, पुस्तक हीच आपली उर्जा मानत स्वाभिमानाने जगले.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना मिळाले. अन् अनपट बिल्डिंगमधील ते उत्तुंग व्यक्तिमत्त्व सगळ्यांच्या नजरेसमोर आले. अन् लक्षात आले अरे या लेखकाला स्वतःचं घर नाही. लगेच राजकारण्यांच्या, महानगरपालिकेच्या घोषणा हातात अन् हवेतच विरतात. संमेलनाचे अध्यक्ष मात्र घराविना राहतात हीच बाब हेरून ग. प्र. प्रधान साहित्यिकांना आवाहन करून 'साधना' च्या साहाय्याने एक सुंदर सदनिका प्राप्त करून देतात.

एका निर्व्याज मनाच्या लेखकाविषयी भावना या लेखात व्यक्त झालेली आहे. भौतिक सुधारणा झाल्या म्हणून आरडाओरडा करणाऱ्या पिढीवर नम्रपणे कोरडे ओढले आहेत.

## १८) अहंकाराचा हिमालय

या लेखामध्ये स्तंभलेखन हे निर्भिड, वास्तव व परिणामाची तमा न बाळगणारे असावे हे लक्षण पुरेपूर दिसून येते. एका वृत्तपत्रात अर्थतज्ज्ञ नरेंद्र जाधव म्हणतात की, 'पाश्चिमात्य जगातील ९९.९९ टक्के लोकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नावही माहिती नाही. 'आमचा बाप अन्

आम्ही' आत्मकथनाचा इंग्रजी अनुवाद झाला की, बाळासाहेबांच नाव परदेशात जाईल.' या विचारावर लेखकांनी खिल्ली उडविली आहे. एखाद्या व्यक्तीला अहंकार झाला की आपण काय बोलतो याचे भान राहत नाही. या लेखात अत्यंत मार्मिकपणे विविध विषयांची उदाहरणे देऊन या विधानावर टीका केली आहे.

बाबासाहेब आंबेडकर कधी संकुचित वागलेच नाहीत. स्वातंत्र्य आणि संस्कृतीचा ध्यास हेच त्यांनी जिवित ध्येय मानले होते. मात्र आजकाल त्यांच्या वैचारिकतेला आव्हान देणारा कुणीही उपटसुंभ भेटतो. ज्याची पात्रता ही त्यांच्याएवढी नसते. या सर्वांचा समाचार या लेखात घेतला आहे. रोखठोक विचार, मार्मिक लेखन हे विशेष या लेखातून दिसून येतात.

## १९) हे चित्र ! आणि ते चित्र !

भारतीय संस्कृती ही जगात महान संस्कृती म्हणून ओळखली जाते. अनेक विद्वान या संस्कृतीत होऊन गेले. पाश्चात्य राष्ट्र आपल्या संस्कृतीचा अभ्यास करतात. संशोधन करतात पण भारतात याचे चित्र काय आढळते. हे स्पष्ट करण्यासाठी पानतावणे यांनी त्यांना समाजात दिसलेली दोन चित्रे दाखविली आहेत.

एकामध्ये 'श्यामची आई' चित्रपटानंतर 'श्वास' या चित्रपटाला राष्ट्रपतींच सुवर्णपदक मिळालं. 'श्वास' ला ऑस्करच नामांकन मिळाले. परदेशात या चित्रपटाची महती कळण्यासाठी ते चित्रपट दाखवणे आवश्यक होते. त्यासाठी भक्कम आर्थिक पाठबळ हवे होते. महाराष्ट्रातील प्रत्येकाने काही ना काही मदत केली विविध संस्था, संघटना कर्तव्यभावनेने पुढे धावून आल्या तेव्हा सचिन तेंडुलकरने आपली बॅट देऊन तिचा लिलाव करण्यास सांगितले. तेव्हा आपल्याकडे अमाप पैसा असूनही त्याने पैसा न देता बॅट दिली. हे लेखकाला खटकले. तेव्हा लेखकरूपी शाळकरी मुलगा कोट्याधीशांना तो शाळकरी मुलगा प्रश्न विचारतो. लेखकाला या ठिकाणी विंदाचा 'देता देता देणाऱ्याचे हात घ्यावे' ही भूमिका स्पष्ट करावयाची आहे.

दुसऱ्या ठिकाणी सुनामीचा उडालेला हाहाकर, गेलेले अनेक बळी, मृत्यूनं जणू थैमानच घातलं होतं. अशावेळी अनेकांनी या पिडीतांना मदत केली. परंतु आश्रय सदनिकांमध्ये असलेल्या निराधार मुलीवर अत्याचर झाले आणि हेही नसे थोडके म्हणून की काय मदतकार्य करताना जातीधर्म पाळला गेला.

अशावेळी लेखक उसळून उठतात. मृत्यूनंतर प्रेताला जात धर्म राहतो काय ? हा खडा सवाल ते करतात. शेवटी ते 'मनुसंस्कृती'वर टीका करतात.

अशाप्रकारे या लेखातुन देशातील सामाजिक, राजकारणाचे, जातीयतेचे वाभाडे काढले आहेत. सहज कळणारी भाषा, थोड्या शब्दात दिलेली उदाहरणे त्यामुळे हे लेख क्रांतीचे गीत गातात.

## २०) उखळात मुंडकं ठेवलंय आहे तर ...

या लेखात १२ जानेवारी हा शिवधर्मोत्सव म्हणून सिंधखेडमधील मातृतीर्थावर झाला. याबाबतचे विचार या लेखात मांडले आहेत. १९ व्या शतकात साऱ्या बहुजनांचा विचार करून हा धर्म वाटचाल करील असे त्यावेळी मराठा महासंघाचे नेते पुरुषोत्तम खेडेकर म्हणाले की, ''कोणताही ग्रह तुमचे वाकडे करणार नाही; तर आमची मुले ग्रहावर जातील ..... मरायला बहुजन आणि चरायला ब्राह्मण हे यापुढे चालणार नाही.

म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुद्धा अनेक वेळा धर्ममार्तंडाविरुद्ध आवाज उठवला. अनेक वेळा धर्म कल्पना बाजुला सारून मानवता धर्म मानण्यास वेळोवळी प्रयत्न केला गेला. याविषयी एन. डी. पाटील म्हणतात, 'जीवनमरणाचे अनेक प्रश्न असताना धर्म हा काही निकडीचा प्रश्न होऊ शकत नाही आणि खरंच धर्माची गरज वाटत असेल तर म. जोतिबा फुल्यांच्या सार्वजनिक सत्यधर्म स्वीकारावा म्हणजे खऱ्या अर्थाने विश्व कुटुंबप्रवृत्ती निर्माण होईल.

यावेळी आपल्या कुलषित इतिहासावर नजर टाकण्याचे ठरवले आहे. मनुची संस्कृती उध्वस्त करण्याची वेळ आली आहे. यावेळी लेखकाने देवाविषयीची असणारी बेगडी संकल्पना स्पष्ट करणारी उदाहरणे दिली आहेत. शेवटी शिवधर्माचे महत्त्व त्याला होणारा विरोध या लेखात स्पष्ट केला आहे.

## २१) ..... त्यापेक्षा मरण आलेले बरे !

विख्यात नाटककार विजय तेंडुलकर हे संवेदनशील व्यक्तिमत्त्व हे केवळ नाटककारच नव्हे तर एक भारतीय म्हणून प्रसिद्ध आहेत. एका पुरस्कार सोहळ्यात ते म्हणाले की, ''आता जगणे फार झाले, त्यापेक्षा मरण आलेले बरे।'' त्यांना हा विषाद का वाटवा म्हणून या लेखात या विधानाचा ऊहापोह केला आहे. तेंडुलकरांनी घटनेचा पुर्नविचार करावयास सांगितले आहे. भारताचं कसं होणार ही शंका व्यक्त केली आहे.

भारतातल्या नव्या पिढीसमोर रोज एक नवा प्रश्न निर्माण होतो. भारतातल्या राजकारण्यांनी सत्तेला गुलाम बनविले आहे. इथल्या राजकारण्यांना सत्तेची नशा लागलेली आहे. मग ती कशीही घ्यावयाची हाच ध्यास ते घेतात. राज्यघटनेच्या बदलाविषयी पानतावणे यांनी डॉ. राजेंद्र प्रसाद यांचे उदाहरण दिले आहे. मंदिरात भुतं शिरली तर ते उध्वस्त केल्याशिवाय राहत नाहीत. राजकारण्यांनीही तसेच केले आहे. परंतु भारतीय राज्यघटना ही बदलास वाव देणारी आहे. दोन जागा मिळवणाऱ्या पक्षाला सत्ताधिकारही सोपवते. परंतु लेखकाला तेंडुलकरांच्या चिंतेविषयी शंका वाटते. म्हणून ते म्हणतात, " ही अस्वस्थता संवेदनशील मनाची मानायची की राज्यघटनेलाच सुरुंग लावून एकाधिकारशाही प्रस्थापित करण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या दुसऱ्या राजकारण्यांची हाच प्रश्न लेखकाला सतावत आहे."

## २२) संमेलनाचे सूप वाजले !

महाराष्ट्रात एकसारखी संमेलने होतात. पण गाजतात ती साहित्य संमेलने पण वाद नाही असे संमेलनच नाही. मराठी साहित्याला नाट्य संमेलन व साहित्य संमेलन ही संमेलने मोठ्या उत्साहाने होतात. नाशिकला साहित्य संमेलन झाले तर, डोंबिवलीला नाट्यसंमेलन.

ही संमेलने गाजली तीही वादानेच. नाशिकला संमेलन यशस्वितेसाठी बोकडाचा बळी दिला! अंधश्रद्धा निर्मूलन खवळून उठले. मग कोणी काही म्हणाले पण शेवटी यावर कसातरी पडदा पडला. संमेलनाध्यक्षाच्या भाषणात मराठी भाषेचे भवितव्य मांडले कारण मुळातच मेश्राम फर्डे वक्ते वक्त्यांनी समारंभाचं औचित्य साधायचं असते. आवेशपूर्ण भाषणानं म्हणे मेश्रामांनी साहित्य संमेलन दणाणून सोडलं. त्यांनी सवाल केला मुंबई कोणाची ? मुंबईवर इतरांचा हक्क काय म्हणून ? मुंबईतील मराठी माणूस मूग गिळून बसला आहे. परप्रांतियांची अरेरावी या महानगरावर चालते." मेश्रामांनी आपल्या भाषणात जागतिकीकरण, देशवासीयांची मानसिकता, मराठी भाषेचे भवितव्य, सामाजिक पुर्नबांधणी, भाषांतर अकाली सांस्कृतिक बडेजाव याविषयी त्यांनी विचार मांडले.

तिकडे नाट्यसंमेलनात पाचशे रूपये प्रवेश देणगीमूल्य ठेवले. त्यावरून रसिकांचा कडवा विरोध. कसेतरी दोनशे रूपयांत भागवले. उद्घाटनला दोन्हीकडे शरद पवार. अमिताभच्या एका मराठी वाक्यावर लाखो टाळ्या. या नाट्यसंमेलनात खरे आजचे नाटक, नाट्यकर्मी यांचे प्रश्न, यावर जीव ओतून बोलले पण शरद पवार व अमिताभ गेल्यावर सर्व लोकांची पांगापांग झाली.

या दोन्ही संमेलनावर होणारा खर्च, राजकारण्यांचा खर्च, चित्रपट अभिनय प्रतिमा, आणि खऱ्या साहित्यिक समस्या या सर्वांची सूत्ररूपाने मांडणी या लेखात केली आहे. दलित चळवळीतील असुनही मेश्रामांवर टीका करायला मागे पुढे पहात नाहीत. हा कणखरपणा यातुन दिसून येतो.

## २३) कालाय तस्मै नमः।

विभागीय अधिकारी आयुक्तांनी मांढरदेवी गडावरील काळेश्वरीच्या देवळात केलेली पूजा ही वादात सापडली होती. देवीच्या प्रकोपामुळे शांतियज्ञानाचा सोहळा झाला आणि तोही शासकीय खर्चाने. नरेंद्र दाभोळकरांनी व दै. लोकसत्तानं याविरुद्‌ध आवाज उठविला. खुद्‌द आयुक्तच अंधश्रद्‌धा पाळत असतील तर ? हा प्रश्न दाभोळकरांनी उचलून धरला. गंगाधर पानतावणे म्हणतात, ''अहो, साताऱ्याची भूमी केवढी क्रांतिकारी ! क्रांतिसंह नाना पाटील इथले. यशवंतराव चव्हाण इथले. कर्मवीर भाऊराव पाटलांचा हा प्रदेश, लक्ष्मणशास्त्री जोशी, नागनाथअण्णा आणि खुद्‌द नरेंद्रभाई दाभोळकरही इथलेच ! सातारा ही जशी आंदोलनाची पेठ तसं भक्तीचही माहेरघर, बर का! मांढारदेव गडावरच्या यात्रेला लोक भक्तिभावानं जातात. प्रचंड गर्दी होते. मग चेंगराचेंगरी. जत्रा म्हटलं की हे आलेच हा सर्व कार्यकारण भाव दुसरं काय ?''

या घटनानंतर लेखकाने टीका करताना म्हटले आहे की या गोष्टींना, अशा घटनांना फक्त कारणे जोडावयाची असतात. हा प्रश्न दाभोळकरांनी उचलून धरला. शेवटी आयुक्तांनी कबुली दिली. 'ही पूजा खाजगी होती.'

या घटनेनंतर लेखक म्हणतात शासकीय खर्चात खाजगी पूजा ? हे कसे काय ? यावेळी लेखकाने या घटनांवर टीका केली आहे.

## 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथामधील वैशिष्ट्यपूर्ण असे मांडलेले राजकीय प्रश्न

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथामध्ये वैशिष्ट्यपूर्ण असे स्तंभलेखन केले आहे. यामध्ये त्यांनी विविध प्रकारचे राजकीय प्रश्न आपल्या ग्रंथाद्‌वारे समाजापुढे मांडण्याचा प्रयत्न केला आहे. घडणाऱ्या राजकीय घटनांच्या दोन्ही बाजू अगदी बेधकडपणे जनमानससमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे आणि म्हणूनच त्यांचे लेखन स्तंभलेखनाच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण असे आहे.

## २४) रबर स्टॅम्प !

भारत हा सर्वधर्म समभाव पाळणारा देश आहे. पण काही राजकारणी मतांसाठी हिंदूत्वाचा प्रचार प्रसार करतात. त्यावरच त्यांची पोळी भाजून निघते. यापैकीच एक नरेंद्र मोदी. नुकताच त्यांना अमेरिकेने व्हिसा नाकारला तेव्हा अनेक बाबींवर चर्चा झाली. त्यावरील हा लेख आहे.

अमेरिका हा श्रीमंत देश आहे. जगावर हुकुमत गाजवण्याची एक ही संधी हा देश सोडत नाही. पण हाही देश एका माणसाला घाबरला. २००२ मध्ये दंगलीतील सर्वेसर्वा मोदीच होते हे आता लपून राहिलेले नाही. सर्वोच्च न्यायालयानेही मोदींच्या हालचाली संशयास्पद होत्या असे म्हटले आहे. त्या मोदी-वाजपेयी सरकारविषयी के. आर. नारायण यांनी गुजरात दंगलीचे सूत्रधार मोदी वाजपेयी असल्याचे म्हटले आहे. कारण गंगाधर पानतावणे सांगतात, "२००२ मध्ये गुजरातेत केवढी दंगल झाली. केवढा नरसंहार झाला ! मानवी हक्क आयोग म्हणाला, 'शहेशनशहा मोदींना, गुजरातमधील जनतेचं जीवन सुरक्षित ठेवण्यात अपयश आलं. समानतेची पायमल्ली झाली. स्वातंत्र्याला सुरुंग लावला गेला. गुजरातेतील भीषण दंगल मोदींना थोपवता आली नाही. शांतता दुभंगून गेली. राज्याचे प्रमुख मोदी पराभूत झाले." असे अनेक आरोप मोदींवर झाले.

खरं तर भारताचा राष्ट्रपती हा घटनात्मक प्रमुख पण कोणतेही अधिकार नसलेला. केवळ सहीचा अधिकार अशीच त्याची संभावना होती. कदाचित राष्ट्रपती पदाचा हा मान असेल पण हे कटू सत्य नाकारता येत नाही. नारायण यांना हे पद सोडल्यानंतर हे समजले. त्याच काळात त्यांनी आपल्या पदाचा वापर केला असता तर भारताची मलीन होत असलेली प्रतिमा मलीन झाली नसती आणि रबर स्टॅम्प हा शिक्काही पुसला असता.

## २५) मी जिंकलो ! मी हरलो !

या लेखात औरंगाबाद येथील निवडणुकीच्या निमित्ताने राजकारण, मतदान, निवडणुका या विषयावर विवेचन केले आहे.

आजच्या निवडणुका म्हणजे दहशतीच्या वातावरणात, पैशाच्या जोरावर चाललेला पोरखेळ झाला आहे. चांगल्या पक्षाचे तिकीट मिळवण्यासठी पैसा, मतदारांना पैसा, आश्वासनांची खैरात, प्रलोभने यातच निवडणुका होत आहेत.

लेखकाने या लेखात लोकशाहीच्या निवडणूक प्रक्रियेवर ताशेरे ओढले आहेत. लोकशाहीचे विटंबन करणाऱ्या लोकांना काळ्या यादीत टाकण्याची मागणी केली आहे. निवडून आला तर ठीक

नाही तर परत धक्काबुक्की, दगडफेक ठरलेलीच. लोकशाही पायदळी तुडवणाऱ्यांना कठोर शासन होण्याची गरज आहे. पोलिसांनी कारवाई केली तर त्यांच्या विरोधात निषेधांच्या घोषणा होतात. झाली पोलिसांवर राजकीय दबाव येतो.

प्रत्येक उमेदवार आपले जे चिन्ह असेल ते लोकांना लक्षात ठेवण्यासाठी विनवणी करीत असतो. प्रत्येकजण आपण जिंकावं म्हणून जीवाच्या पलीकडे जावून त्यांचे प्रयत्न सुरू असतात. निकाला विषयी गंगाधर पानतावणे म्हणतात काय एकेक निकाल असतात. कुणाचा अपेक्षाभंग होतो तर कुणाला आश्चर्याचा धक्का. पराभव सहन न झालेल्या कित्येकांच्या डोळ्यात तरारलले पाणी, तर अनपेक्षित विजयाने कित्येकांच्या डोळ्यात आनंदाश्रू अशी ही उभे राहणाऱ्या उमेदवारांची स्थिती. या वातावरणात होणाऱ्या या निवडणुका लेखकाला अस्वस्थ करतात. संविधानालाच आव्हान देणाऱ्या प्रवृत्तींना आळा घालण्याची अपेक्षा करतात. तरच भारतीय लोकशाही यशस्वी होईल.

## २६) धर्मनिरपेक्षतेचे राजकारण

राजकारण हे एक असे क्षेत्र आहे की जिथे शब्दांची फिरवाफिरव लगेच केली जाते. एखाद्या भाषातज्ज्ञाला सुचणार नाहीत अशी नामावली यांची तयार असते.

काही दिवसांपूर्वी लालकृष्ण अडवाणींनी बॅ. जीनांना धर्म निरपेक्ष असे म्हटले आहे. पाकिस्तानात जावून हिंदूच्या नेत्याने अशी स्तुती सुमने उधळावीत यालाच कदाचित राजकारण म्हणत असावेत. बॅ. जीना हे तसे खुप हुशार, कुशाग्र बुद्धीचे नेते होते. पण शेवटी त्यांनी कट्टर मुस्लिम वाद पत्करला. परंतु या वाक्याने भारतात हल्लाबोलच उठला. सारे विरोधक उठून बसले. साऱ्यांनी अडवर्णीना जाब विचारला.

गंगाधर पानतावणे लिहितात, ''अडवर्णीना जीनांचा लेखाजोखा माहीत नव्हता असं म्हणता येईल का ? मग जीनांच्या देशात जिनांचा गौरव हा अडवाणींच्या राजकारणाचा भाग मानायचा का ? जीनांना सेक्युलर पदवी बहाल करून पाकिस्तान्यांना खुष करायचे होते की, त्यांना मूर्ख बनवायचे होते ? त्यांची राजकीय फसवणूक करायची होती की भारतीयांची ?'' असा सरळ प्रश्न ते करतात.

या सर्व घटनेमुळे लेखक या दलबदलू समाजाला भुलवणाऱ्या राजकारण्यांना जाब विचारतात. यावरून लेखकाला या राजकारण्यांविषयी असलेली चीड दिसून येते.

## २७) एक होत थाटमाटनगर ...

एक राजकीय विडंबन अत्यंत समर्पक शब्दात पानतावणे यांनी या लेखात मांडले आहे. कोकणच्या सिंहाने केलेल्या 'बंडा'ने बेजार झालेले थोरले महाराज. त्यांच्या हातात रुद्राक्ष माळ धारण केलेली असते. त्यांचा एक दरबार असतो. दरबारात प्रवेश केल्यावर दोन्ही हात उंचावून ते सर्वांकडे पाहतात. सोबत धाकले महाराज असतात. हे सारे वर्णन वाचल्यावर थोडीफार राजकीय जाण असलेल्या सर्वसामान्य वाचकही हे वर्णन कोणाचे आहे ते सहजपणे सांगू शकेल. ज्या सामान्य वाचकांसाठी स्तंभलेखन असते. त्यांना सहजपणे आकलन व्हावे तरीही आपला एक दर्जा राखून लेखन करावे ही तारेवरची कसरत येथे पानतावणे यांनी सांभाळली आहे.

नारायण राणेंच्या बंडाने शिवसेनेत पसरलेली अस्वस्थता, त्यामुळे बाळासाहेब ठाकरे आणि धाकले महाराज म्हणजे उद्धवजी ठाकरे याचे आपल्या सैनिकांशी झालेला काल्पनिक संवाद या माध्यमातून विनोदी पद्धतीने त्यांनी उभा केला आहे.

## २८) रेड कार्पेट

पंतप्रधान मनमोहनसिंग हे मृदू स्वभावाचे. परंतु आपल्या विचारांशी ठाम असणारे विद्वान गृहस्थ आहेत. अमेरिकेमध्ये ते गेले असताना तिथे त्यांचे झालेले जंगी स्वागत त्यांनतर अध्यक्ष बुश यांनी 'व्हाईट हाऊस' मध्ये त्यांचे केलेले जंगी स्वागत आणि मनमोहनसिंह यांच्याकरीता दिलेला रेड कार्पेट (लाल गालिचा) अंथरून त्यावरून चालण्याचा सन्मान. हा सन्मान मिळणारे बुश यांच्या कारकिर्दीतले जागतिक कीर्तीचे तिसरे नेते आहेत.

पण या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर होणारी भारतीय नेत्यांकडून टीका चुकीची आहे असे लेखकाला वाटते. लेखक त्यांच्याविषयी सांगतात. भांडवलदार देशाकडे मैत्रीचा तळहात पसरणं हे राष्ट्रीय बाण्याचा अवसानघात करणारं आहे. राष्ट्रभक्तीचं उसनं तुणतुणं पुन्हाः पुन्हा वाजायला लागलं. तसे पंतप्रधान मनमोहनसिंह तडकलेच म्हणाले, 'कम्युनिस्टांनी काँग्रेसला राष्ट्रभक्ती शिकवू नये.' सौम्य स्वभावाचा माणूसही मर्मावर कुणी आघात केला तर परखड होतो बघा !

अमेरिकेच्या भूमीतच पाकिस्तानला खडे बोल सुनावणारे आणि बुश यांच्या समोर 'अतिरेकी क्रूरकर्मा लादेन याचे शागिर्द पाकिस्तानातच आहे आणि त्याचा धोका पाकिस्तानला आणि मुशर्रफलाही आहे. असे रोखठोक सांगणारे मनमोहनसिंग यांनी वाजपेयी यांनाही सांगितले की, 'भारत कुणा देशाच्या ताटाखालचं मांजर होणार नाही.'

## २९) गदगदणारं दु:ख

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी इंदिरा गांधींच्या हत्येने सारा देश दु:खात लोटला गेला. ज्या नेहरू घराण्यावर देशाने जीवापाड प्रेम केले. त्या घराण्यातील इंदिरा गांधी या एक फुललेला गुलाब होता असे लेखकाला वाटते. म्हणूनच निर्दयपणे चिरडणे हा एक अक्षम्य अपराध आहे. पण त्याहीपेक्षा या हत्येनंतर देशभर उठलेला दंगलीचा लोळ कोणत्याही विचार करणाऱ्या माणसाला अस्वस्थ करणारा होता. या शिख दंगलीवरील नानावटी आयोग संसदेपुढे मांडताना पंतप्रधान डॉ.मनमोहनसिंग यांनी स्वत: शिख असुनही शासनाच्या वतीने साऱ्या शीख समाजाची माफी मागितली. हे एका सुसंस्कृत माणसाने केलेली विनवणी होती आणि इंदिराजींच्या अकाली मृत्यूने गदगदणाऱ्या दु:खाची ती कैफियत होती. संसदेसमोर भाषण करताना पंतप्रधान म्हणाले होते, अशी स्थिती निर्माण करू नका. अशी भाषा वापरू नका ..... राष्ट्रीय सख्य घडविण्यासाठी खंबीरपणे काम करण्याची भावना तेवत ठेवणे हा प्रत्येक नागरिकांच्या डोळ्यातील अश्रू पुसणे हेच आमचे ध्येय असायला हवे.

म्हणून या प्रचंड दु:खामुळे लेखकाला तुकारामांच्या 'दु:ख पर्वता एवढे' या आत्मप्रत्ययाची आठवण येते. एखाद्या तत्कालीन घडलेल्या घटनेतून इतिहासाचे स्मरण आणि इंदिराजींच्या महान व्यक्तिमत्त्वाचा मागोवा या स्तंभलेखनातून या लेखकाने घेतला आहे. इंदिरा गांधींच्या विषयी एका मुत्सद्दी राजकारण्यानं म्हटलं होतं. 'संसदेत फक्त एकच पुरुष आहे, तो म्हणजे इंदिरा गांधी' या विधानावरून ते महान व्यक्तिमत्त्व डोळ्यासमोर उभे राहते आणि गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथामध्ये घेतलेला या व्यक्तीचा मागोवा सार्थ वाटतो.

## ३०) घेणाऱ्यांचे हात हजार

औरंगाबादच्या सुभेदारी गेस्ट हाऊसवर मुख्यमंत्र्याकडे आपल्या कामासाठी, मागण्यासाठी आणि निवेदने देण्यासाठी दोन-तीन दिवस औरंगाबाद कसे गजबजून गेले होते याचे वर्णन पानतावणे यांनी या लेखात केले आहे. मोर्चा, शिष्टमंडळ ते घेवून येणारे त्यांचे नेते आणि प्रत्येकाला प्रत्यक्ष मुख्यमंत्र्यांना भेटण्याची असलेली निकड याचे वर्णन हलक्या फुलक्या विनोदी शैलीत लेखकाने केले आहे. कामगार, शेतकरी, श्रमिक, महासंघ, दलित, रिपब्लिकन जनता, पँथर, शिक्षक इ. साऱ्यांचे मोर्चे थोपवताना पोलिसांची मात्र धावपळ होत असते. या साऱ्या धावपळीत मुख्यमंत्री देशमुख आणि उपमुख्यमंत्री आर. आर. आबा यांनी दिलेली आश्वासने आणि केलेले वायदे या

पलीकडे जनतेच्या हातात काहीच लागत नाही. औरंगाबाद, नांदेड, सोलापूरच्या विद्यापीठांना भक्कम, आर्थिक मदत जाहीर झाली. लातूर, औरंगाबाद, मेडिकल कॉलेजना पॅकेज दिले. न राहवून तरुण नेते मेटे मुख्यमंत्र्यांना म्हणाले, मागील आश्वासाने पूर्ण करा नुसती पॅकेज आणि घोषणा नको ! यावर पानतावणे यांनी मुख्यमंत्र्यांच्या उत्तराचे केलेले वर्णन म्हणजे राजकारणी कोणाला काही नाही म्हणत आणि कोणाला काही देतही नाहीत याचेच प्रतीक आहे. लेखक म्हणतात समोर आलेले केस सराईतपणे मागे सारीत नि नेहमीचं राजकीय स्मित करीत नेहमी प्रमाणे मुख्यमंत्री म्हणाले, ''हो, हो !''

## ३१) अध:पतन

लोकशाही समाजरचनेमध्ये निवडणूक अपरिहार्य आहेत पण राजकारणाच्या आखाड्यात प्रामाणिकपणे काम करणारा एखादा कार्यकर्ता देखील निवडून आल्यानंतर किती बदलतो आणि सत्ता त्याला किती बिघडवते याचे वास्तव चित्रण या लेखामध्ये पानतावणे यांनी केले आहे. भाऊसाहेब डोंगरे हे जनसामान्यांच्यात मिसळणारे व्यक्तिमत्त्व तीन वेळा लोकसभेला निवडून गेले. या यशाने त्यांच्यात आमुलाग्र बदल झाला. सामान्य माणसांना टाळू लागले. त्यांची कामे होणे बंद झाले. एवढंच काय पण गावाकडच्या आणि घरातल्या माणसांनाही त्यांनी बेदखल केले. पत्नीकडे दुर्लक्ष केले.

एखादा व्यक्ती किती प्रमाणता बदलू शकतो याचे उत्तम उदाहरण लेखकाने आपल्या ग्रंथामध्ये दिले आहे. भाऊसाहेबांविषयी लेखक म्हणतात, ''आता तर कार धूळ उडवीत जाते. भाऊसाहेब खाली उतरतच नाहीत. लोक आशाळभूतपणे पाहतात. भाऊसाहेब आता बोलतील. मग बोलतील. पूर्वीसारख पाठीवरून हात फिरवतील. आई, बाबा, आजोबा म्हणून हाक देतील. पण कशाचं काय ? त्यांची गाडी केव्हा येते नि केव्हा जाते काही कळतच नाही.''

भाऊसाहेबाच्या या बदललेल्या व्यक्तिमत्त्वाबद्दल सांगत असताना वृत्तपत्रात आलेली बातमी संसदेत प्रश्न विचारण्यासाठी खासदारांनी केली पैशाची मागणी आणि खासदार निधीतील कामासाठी लाच घेणारे खासदार निलंबित. त्यामुळे सोमनाथ संतप्त. ही बातमी ऐकल्याबरोबर गावाकडेच आबा म्हणतात, ''मास्तर त्या यादीत आपल्या भाऊसाहेब डोंगरे खासदाराचं नाव आहे की नाही तेवढं बघा नक्कीच असेल।'' एका खासदाराबद्दल सामान्य जनतेने व्यक्त केलेला मिश्कीलपणा, विश्वास फक्त त्या खासदाराचे. नव्हे तर एकुण लोकशाहीचे अध:पतन आहे हे

पानतावणे यांनी सुचकपणे मांडले आहे. वरीलप्रमाणे 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथामधील वैशिष्ट्यपूर्ण असे राजकीय लेखन आपणास दिसून येते.

## 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथातील वाङ्मयीन वैशिष्ट्ये असणारे लेखन

गंगाधर पानतावणे यांनी आपल्या ग्रंथामध्ये केलेले हे वाङ्मयीन लेखन हे खूप महत्त्वपूर्ण असे लेखन आहे. या लेखामधील व्यक्तीचित्रण, भाषाशैली, संवादशैली, घटना हे सर्व त्यांच्या लेखनशैलीत दिसून येते आणि म्हणूनच त्यांचे स्तंभलेखन वाङ्मयीन दृष्ट्या महत्त्वपूर्ण वाटते.

## ३२) कवीचा मृत्यू

या लेखात एका संवेदनशील कर्तृत्ववान कवीची व्यक्तीरेखा रेखाटली आहे. निरंजन उजगरे या कवीच्या निधनाने झालेला शोक व त्यांची आठवण या लेखात वर्णिलेली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळातील निवडक भारतीय कवितांचा अनुवाद 'काव्यपर्व' या संग्रहात त्यांनी केलेला आहे. समाज आणि संस्कृतीमधील विरूप. निरंजनला सदैव अस्वस्थ करीत म्हणून त्यांनी माणसांचे आक्रंदन अत्यंत कमी शब्दात व्यक्त केले आहे. त्यांच्या कवितेविषयी पानतावणे म्हणतात, ''निरंजनची स्वत:ची कविता तर चिंतनाचा सावलीत विसावलेली कुठे ही आक्रस्थाळी नाही. शब्दांवडंबराचा सोस नाही. भडकपणाची संगत नाही. अतिरंजनाचा हव्यास नाही.'' यावरूनच त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्ये कळून येतात. आखातात गेलेल्या भारतीयांचे करपलेले भावविश्व त्याला सदैव अस्वस्थ करत होते. असा हा लोकजीवनाची नाळ सतत साधणारा कवी जेव्हा जगाच्या पडद्या आड गेला.

**''सावल्याच्या प्रदेशाचे एक एक अरण्य**
**गळून पडायचे तेव्हा पडतीलच**
**मुठीमध्ये धरून ठेवलेले काजवे .... ''**

असा तरल मनोवृत्तीचा वसा कवितारूपी ठसविलेला आहे. या लेखात कमीत कमी शब्दात कवीच्या मनाचे अंतरंग उलगडून दाखवले आहे.

## ३३) काझी सलीम

उर्दू कवी काझी सलीम याच्या निधनामुळे उर्दू साहित्याला झालेली हानी या लेखात विस्तृतपणे मांडली आहे.

काझी हे मानवतावादी कवी आहेत. आजच्या तरुण जीवनातील असंतोष, निराशा, असमाधान त्यांच्या कवितेतून व्यक्त झालेले आहे. या भावना व्यक्त करण्यास कविता अपुरी पडू लागली म्हणून 'जदीद' या नव्या प्रकाराची सुरुवात त्यांनी केली आहे. मानवतावाद व स्वातंत्र्य यांचा ध्यास घेणं हीच आजच्या कवितेची गरज आहे. जगात दररोजं होणारे नरसंहार यामुळे त्यांचे कवीमन व्यथित होताना दिसून येते. त्यांच्या कवितेतून ग्रीक, रोमन, हिंदू, 'मिथ्य' येताना दिसून येतात. मुक्त छंदात्मक रचना, भावना व विचारांच अतूट नातं साधते. ते कवितेतूनच निसर्ग व माणसांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण करतात.

अशाप्रकारे पानतावणे यांनी या लेखातून काझी सलीम यांचे व्यक्तिमत्त्व उभे केले आहे. या लेखाद्‌वारे एक प्रकारे त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## ३४) सूर्य कुलातील कवीचा गौरव

कवी नारायण सुर्वे एक अनाथ पोर. गंगाराम सुर्वे नावाच्या बापाला सापडले. महामाया-नगरीत त्या अश्राप जीवाला आसरा मिळाला. अशा या अनाथ मुलाने कामगारांची तलवार होण्याचे भाग्य मिळवले.

नुकताच त्यांना कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा 'जनस्थान पुरस्कार' मिळाला. मराठीतील हा ज्ञानपीठ पुरस्कारच गणला जातो. नारायण सूर्वे हे सुर्य कुलातील कवी आहेत. लेखक त्यांची केशवसुत - कुसुमाग्रज - सुर्वे - ढसाळ ही परंपरा सांगतात. महानगरातील श्रमिकांचे शोषण प्रत्ययकारितेनं मांडलेले आहे. म्हणूनच डॉ. सुधीर रसाळ म्हणतात, "जीवनाबद्दलच्या आपल्या भावनिक वैचारिक प्रतिक्रिया ते वाचकासमोर ठेवत असतात. आपले विचार, आपल्या भावना, आपल्या श्रद्धा जीवनाच्या काही अंगाबद्दल अनुकूल तर काही अंगाबद्दल विरोध, जीवनाबद्दलच्या आपल्या अपेक्षा, आपली स्वप्ने हे सारे सुर्वे वाचकांसमोर मांडत असतात."

अशाप्रकारे एका कामगाराच्या कवीचे व्यक्तीचित्रण लेखकाने रेखाटले आहे. त्यांच्या साहित्याचा मागोवा घेत समाजातील पुरस्कारांच्या खैरातीवर उपरोधिकताही स्पष्ट केली आहे.

## ३५) 'तांडा'काराचे निर्वाण

आत्माराम राठोड या बंजारा समाजातील कार्यकर्त्याविषयी लिहिलेला हा लेख आहे. हा लेखक एक कवी, संशोधक, कार्यकर्ता, राजकारणी म्हणून प्रसिद्ध होता.

राठोड यांनी गोर बंजारा संस्कृतीची आणि लोकजीवनाची माहिती जगाला दाखवून दिली. त्यांच्या संशोधनाने गोरबंजारा समाजातील भाषा-संस्कृती यांची माहिती करून दिली. यवतमाळ जिल्ह्यातील पुसदजवळील मेहा येथे त्यांचा तांडा होता. तांडातील जीवनानुभव, चालीरीती, सण, विवाहसंबंध, व्यवहार, पंचायत यांची माहिती दिली. दारिद्र्य, अज्ञान, राजकीय नीती असे कितीतरी अनुभव त्यांनी सांगितले आहेत. पुसदला अस्मितादर्श साहित्य संमेलन घ्यावयाचे ठरले. तेव्हा त्याने केलेली धावपळ हे नेहमीच लेखकाच्या लक्षात राहते. राठोड यांना आपल्या तांडाविषयी, साहित्याविषयी, वाङ्मयाविषयी आणि अस्मितादर्श आणि पानतावणेसारख्या व्यक्तीविषयी फार मोठ्या प्रमाणात आपुलकी होती हे वरील लेखावरून लक्षात येते.

शेवटी या आत्माराम राठोडने धर्मांतर करून डॅनियल राणा झाला. येशुच्या धर्मशाळेत त्याने मनाची शांती स्वीकारली. अशा या हरहुन्नरी कार्यकर्त्याविषयी आपले मनोगत या लेखात मांडले आहे.

## ३६) नवा शिपाई

एकोणचाळीस वर्षांचं आयुष्य मिळालेल्या केशवसुतांना मराठी नवसाहित्याचे जनक मानले जाते. आधुनिक कवितेचे जनकत्व केशवसुतांकडे जाते. महाकवी म्हणून ज्यांनी त्यांना गौरविले. त्यांनी पुढे त्याचे कवित्व नाकारण्याचा प्रयत्न केला. आपल्या संकुचित वृत्तीचे दर्शन घडविले. मराठी कवितेत नवयुग निर्माण करणारा महाकवी आपल्या प्रतिभेद्वारे जनसामान्यांच्या वास्तव भावना आपल्या कवितेतुन उभा करीत होता. परमार्थिक पौराणिकेतुन मराठी कवितेला बाहेर काढून त्यांनी सामाजिक अस्तित्वाच भान त्यांनी मराठी कवितेतून वाचकांना दिले. जीवनाचे तत्त्वज्ञान सांगण्यसाठी ते निसर्गातील प्रतिमांचा वापर करीत. त्यांच्या कवितेत जीवनविषयक तत्त्वचिंतन होते. त्याचबरोबर क्रांतीकारक विचारही होते. समाजपरिवर्तनाचा विचार त्यांच्या कवितेतून प्रतित होताना दिसतो.

**'नव्या मनूतील नव्या दमाचा शूर शिपाई आहे ।**
**कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे ।।'**

या ओळीतून त्यांच्या विचारांची उंची समजून येते.

लेखकाने महाकवी केशवसुतांचे मराठी साहित्यातील योगदान स्पष्ट करीत मूल्यहीन साहित्यिकांच्या हित प्रवृत्तीचे दर्शन घडविले आहे. केशवसुतांच्या विविध कवितांचे संदर्भ देत

त्यांची आधुनिकता कशा स्वरूपाची होती. त्यांचे विचार समाजन्मुख कसे होते. हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर त्यांच्या विषयीची व्यक्तिगत मते ही व्यक्त केली आहे.

### ३७) मालवणकर आणि बांद्रेकर

पानतावणे हे वैचारिक आणि गंभीर प्रवृत्तीचे लेखक आहेत. परंतु या लेखामध्ये राजकीय विडंबन उपहासात्मक पद्धतीने कोणत्याही राजकीय नेत्याचे नाव न घेता. परंतु सामान्य वाचकालाही त्याची ओळख सहज पटेल असे लेखन केले आहे. मालवणच्या पोटनिवडणूकीत, शिवसेना पराभूत झाली आणि राणे (मालवणकर) विजयी झाले. त्यामुळे संतापलेल्या उद्‌भव बांद्रेकर (उद्धव ठाकरे) यांचा मन:स्ताप पानतावणे यांनी मिश्किल पद्धतीने मांडला. त्यांच्या सोबतच्या कार्यालया-मधील पंत, दत्ताजी, प्रमोदजी, अमुकराव, तमुकराव आणि त्या साऱ्यांचे राजकीय बोलणे यामुळे या लेखाला विनोदी झालर मिळाली आहे.

राजकीय विडंबन करीत असताना राजकारणाचा अभ्यास तरल व विनोदी बुद्धी व सूक्ष्म निरिक्षण असणे आवश्यक आहे. हे सर्व गुण पानतावणेच्या लेखणीतून या लेखात उतरलेले दिसतात.

### ३८) बखर एका राजाची

जेष्ठ कवी लेखक आणि साहित्याचे गाढे अभ्यासक त्र्यं. वि. सरदेशमुख यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचा वेध पानतावणे यांनी या लेखात घेतला आहे. सरदेशमुखांच्या सहवासातल्या आठवणी आणि अस्मितादर्शच्या माध्यमातून त्यांच्याशी आलेला संबंध यांच्या आठवणी मांडताना पानतावणेंचे वर्गमित्र कवी ग्रेस (माणिक गोडघाटे) यांचीही आठवण त्यांनी जाता जाता नोंदविली आहे.

**न मिलता राम तो बरबादी के अफसाने कहाँ जाते**
**अगर दुनिया चमन होती तो वीराने कहाँ जाते**
**चलो अच्छा हुआ अपनों में कोई गैर तो निकला**
**अगर होते सभी अपने तो बेगाने कहाँ जाते**

या शकील बदायूनीच्या गझलचा हळवा संदर्भ देवून पानतावणे यांनी सरदेशमुखांच्या रसिक वृत्तीला दाद दिली आहे म्हणून पानतावणे म्हणतात, 'सरदेखमुखांसारख्या सव्यसायी साहित्यनिर्माता आज नाही, हे दु:ख मराठी साहित्यविश्वाला किती काळ साहावे लागेल. कुणास ठाऊस !'

## स्तंभलेखनाच्या दृष्टिकोनातून असलेल्या स्त्रीवादी वैशिष्ट्यांनुसार 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथातील लेखन

### ३९) स्त्री जन्मा, ही तुझी कहाणी !

'नही स्त्री स्वातंत्र्यमर्हती' स्त्रीला काल, आज, आज अखेर तरी स्वातंत्र्य अजूनही नाही. प्रत्येक वर्षी आंतरराष्ट्रीय महिला दिवस साजरा केला जातो. सामाजिक चळवळी होतात. स्त्रियांना राजकारणात संसदेत ३३% आरक्षण देण्याचे प्रत्येक सरकार ठरविते पण त्यांची पूर्तता मात्र करीत नाही. स्त्रियांनी पायाची दासी म्हणून जगावे. त्यांना केवळ या समाजाने भोगवासी म्हणूनच वागविले आहे.

भारतीय संस्कृती ही ग्रीक संस्कृतीपेक्षाही जुनी आहे. 'मातृदेवोभव' म्हणणारी आमची गार्गी, मैत्रेयी, शर्मिष्ठा यांची उदाहरणे देते पण प्रत्यक्षात त्यांच्या नशिबी चूल, मूलच येते. त्यांचे विश्व या भोवतीच फिरत राहते.

१७९२ मध्ये मेरी वाल्स्टोन क्राफ्ट या स्त्रीने स्त्रियांच्या चळवळीला वाचा फोडली. जगात वेगवेगळ्या देशातही स्त्रियांना रोखण्याचेच प्रकार होतात. म. फुले, मार्क्स, बुद्ध, महर्षी शिंदे, आगरकर, ताराबाई शिंदे अशा अनेक व्यक्तीचे कार्य महनीय आहे. इंदिरा गांधी या तर भारताच्या पंतप्रधान बनल्या. पण गडचिरोली जिल्ह्यातल्या गोलगावच्या महिला सरपंच सुकराबाई यांना हातावर कटोरा घेऊन भीक मागते म्हणून गाव सोडण्याची पाळी आली. म्हणूनच लेखक डोळे झाकून आंतरराष्ट्रीय दिवस साजरा करणाऱ्या समाजाच्या डोळ्यात ते अंजन घालू इच्छितात.

### ४०) केवढे हे क्रौर्य

बालविवाह हा भारताला लागलेला शाप आहे. इंदूर मधील शकुंतला नावाच्या समाजसेविकेच्या हातावर तलवारीने हल्ला केला. गुन्हा हाच की ती बालविवाह रोखत होती.

मनुने सगळ्या धर्मात विष पेरण्याचे काम केले आहे. बालविवाह ही तर खूप मोठी समस्या आहे. पूर्वी तर पाळण्यातच विवाह व्हायचे. नाना फडणीसांचा मरणाच्यापूर्वी नऊ वर्षाच्या मुलींशी सातवा विवाह झाला होता. आपल्या संस्कृतीने घालून दिलेले अनेक नियम बदलण्याची गरज आहे. समज नसलेल्या वयातील विवाह, शरीरसंबंध, शारीरिक क्षय आणि त्यामुळे होणारे मृत्यू आजही पाहावयास मिळतात. विविध समाज सुधारकांनी केलेली आंदोलने, जोतिबा, आगरकर, लोकहितवादी, राजा राममोहन रॉय या सर्वांनी केलेल्या चळवळीमुळे बालविवाहाचे प्रमाण घटले आहे.

लेखक यासाठी समाजातील मानसिकता बदलण्याची अपेक्षा करतात. ते म्हणतात, ''मठाधिपतींनी प्रबोधनाचा वसा उचलायला हवा. धर्मगुरूंनी अपचालींचा नि:पात करण्यासाठी सरसावलं पाहिजे ना ! त्यांनी आपल्या कोशातून बाहेर पडायला हवं. समाजदेहावरचा कलंक धुऊन टाकायला हवा.''

अशा प्रकारे लेखकाने समाजात होणाऱ्या बालविवाहाबद्दल चिंता व्यक्त केली आहे. आजही कायदा करूनही बालविवाह होण्याचे प्रमाण कमी झालेले नाही. समाजाची मानसिकता बदलल्याशिवाय हे शक्य होणार नाही.

## ४१) लावणीचे लावण्य हरपले

अस्सल मराठमोळं शृंगार रसात चिंब करणारं सौंदर्याचा आविष्कार दाखवणारं गाणं म्हणजे 'लावणी' होय. घुंगराचा नाद आणि ढोलकीची थाप सोबतीला ठसकेदार अस्सल मराठी आवाज म्हणजे रोशन सातारकर. ज्यांनी मराठी लावणीला रसिकांच्या मनात रुंजी घालायला लावली. आज रोशन सातारकर नाहीत परंतु त्यांनी गायलेल्या लावण्या रसिकांना धुंद करतात. लावणीविषयी असणारे गैरसमज त्यांनी दूर केले आणि लावणीला फडातून माजघरात आणलं. लावणी फक्त शृंगार रसाच दर्शन नव्हे तर त्यात समाज मनाच्या सर्व पैलूंचे दर्शन घडते. रोशन सातारकरांनी -

**नवऱ्याने सोडलिया दारु ।**
**बाय देव पावलाय ग ।।**

तसेच

**उद्या जाईन मी माझ्या गावा ।**
**माझ्या अंगाला हळद लावा ।।**

अशा सामाजिक आशयाच्या लावण्याही अजरामर केल्या. गायकीचा वेगळा बाज जपत ठसकेदार आवाजाची मोहनी संपूर्ण मराठी रसिकांवर घालणाऱ्या या गायिकेच्या वाट्याला पोरवयातच पायात घुंगरं बांधून नाचावं लागलं. वाढत्या वयाबरोबर अनेक समस्या निर्माण होत गेल्या. त्यांना तोंड देत रसिक मायबापाची सेवा संपूर्ण हयातभर केली. सुरूवातीला त्यांच्या लावण्या नाक मुरडणाऱ्या तथाकथीत उच्चभ्रुना देखील त्यांनी ठेका धरायला लावला. अनेक लावण्या त्यांनी गायल्या त्याबरोबर त्यांनी चित्रपटांतून गीते गायली.

अशा अनेक मान-सन्मान, पुरस्कार मिळवलेल्या रसिकांच्या गळ्यातील ताईत बनलेल्या परंतु उतारवयात ही दु:खच वाट्याला आलेल्या महान गायिकेचे व्यक्तिमत्त्व लेखकाने या लेखात उभे केले आहे. रोशन सातारकरांच्या बद्दल लेखात केलेले विधान सर्वार्थानं सार्थ वाटते. 'लोककलेचा सांस्कृतिक ठेवा पोरका झाला.'

## ४२) दिल्ली हायकोर्टाचा निर्णय

पंधराव्या वर्षी लग्न करणं योग्य असा निर्णय हायकोर्टाने दिल्यानंतर त्या निर्णयाच्या विरोधात सर्व देशभर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. राष्ट्रीय महिला आयोग, समाजचिंतक, अनेक व्यक्ती यांनी या निर्णयाला विरोध केला. बालविवाहामुळे स्त्रीजीवन उध्वस्त होऊन जातं. जे वय खेळायचं असतं बागडायचं असतं ज्या वयात शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक वाढ व जडणघडण होत असते. अशा वयात लग्न झाल्याने त्या स्त्रीच्या वाट्याला मरणप्राय यातना येतात. या निर्णयाने बालविवाह धर्मशास्त्राच्या आधारे केले जात होते. त्या त्या वयात मुलींची लग्ने झाली तर आई वडिलांना मुक्ती मिळते असे धर्मशास्त्र सांगतं. याचाच आधार घेत सनातनी धर्ममार्तंडांनी स्त्रियांचे जीवन नरकमय करून टाकले. बालविवाहाच्या रूढीमुळे कोवळ्या मुलींचे विवाह जरठांशी म्हणजे आपल्या वयाच्या तिप्पट व चौपटीनं मोठ्या पुरुषांशी केला जात असे. हे सत्य माणुसकीला काळीमा लावणारे आहे. अनेक समाजसुधारकांनी या प्रथेविरुद्ध जनजागृती केली. त्यांना त्यावेळी सनातन्यांनी विरोध केला. संमती वयाला विरोध करणाऱ्यांच्यात लोकमान्य टिळकांचाही समावेश होता. त्यांनी परिवर्तनवादी विचारांना विरोध केला. 'केसरी' मधून त्यांनी या चांगल्या विचारांचा विकृत अर्थ लावला. संमतीवयाला विरोध करणाऱ्या लोकमान्य टिळकांनी मात्र आपल्या मुलीचा विवाह वय १४ झाले तरी केला नव्हता. याबद्दल त्यांचे आगरकरांनी अभिनंदन केले होते.

लेखकाने या लेखामध्ये आजचा संदर्भ देत असताना पौराणिक ऐतिहासिक दाखले व उदाहरणे देत हा निर्णय कसा चुकीचा आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

## ४३) रोझा पार्क्स

निग्रो व श्वेत हा अमेरिकेच्या इतिहासातील महत्त्वाचा अध्याय. वर्णद्वेष किती विकोपाला गेला होता याचं प्रत्यंतर अमेरिकेला अब्राहम लिंकनच्या खूनानंतर आले. एका मानवानं दुसऱ्या मानवाला अमानुष व गुलामाची वागणूक देण्याचा अमानुष प्रकार अमेरिकेत सर्रास सुरू होता. निग्रोंना कसलीच किंमत नव्हती. स्वत:च आयुष्य नव्हते. कमालीचे कष्ट, निंदा, अपमान त्यांच्या

भाळी होता. श्वेतांच्या अन्यायांनी व अत्याचारांनी हतबल झाले होते. अस्तित्वहीन जीर्ण पारतंत्र्याच्या बेड्या इच्छा असूनही तोडता येत नव्हत्या. आलाबामा राज्यातील मॉटगोनरीच्या रोझा पार्क्स बसने जात असताना श्वेत कंडक्टरने बसण्याच्या जागेवरून त्यांचा अपमान केला आणि निग्रो क्रांतीच्या चळवळीचे स्फुल्लिंग पेटले. मार्टिन ल्युथर किंगने या चळवळीचे नेतृत्व केले. निग्रोंना संघटित केले व आपला लढा महात्मा गांधीजींच्या तत्त्वावर चालविला. गांधींचा अहिंसेचा विचार सांगताना तो म्हणाला होता, अहिंसावादी चळवळी या भेकडांच्या चळवळी नाहीत. 'हिंसेला घाबरतो तो अहिंसावादी नव्हे.' निग्रोंना नागरी हक्क मिळाले पाहिजेत. त्यांना सर्व प्रकाराच्या बंधनातून मुक्त करत माणसांसारख वागवलं पाहिजे. यासाठी मार्टिन ल्युथर किंगने चळवळ चालवली. पण ती अहिंसेच्या मार्गाने. 'अहिंसावादी' लोकचळवळीनेच निग्रोंचे आत्मबळ वाढेल आणि निग्रोंना आपल्या अस्तित्वासाठी आणि अस्मितेची जाणीव होईल यावर मार्टिनचा विश्वास होता.

लेखकाने रोझा पार्क्स यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे क्रांतिकारी ठिणगी असं सांगताना निग्रोंच्या मुक्तीचा व मार्टिन ल्युथर किंग यांचे कर्तृत्व या ठिकाणी उलघडून दाखविताना निग्रोंच्या स्वातंत्र्य चळवळीची माहिती देण्याचा यशस्वी प्रयत्न केल्याचे दिसते.

अशा प्रकारे गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथामध्ये रूढी, परंपरेपासून ते स्वातंत्र्यापर्यंत स्त्रियांच्या बाबतीत घडणाऱ्या अनेक प्रश्नांना त्यांनी समाजापुढे मांडण्याचा आणि आजच्या बालविवाह प्रथेवरून जनसमाजाच्या डोळ्यात अंजन घालण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला गेला आहे.

## 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथातील शैक्षणिकदृष्ट्या विचार

### ४४) शिस्त म्हणजे शिस्त !

विद्यार्थी जीवनात शिस्त खूप महत्त्वाची असते. माणसाच्या मनावर आणि वर्तनावर नियंत्रण ठेवते ती शिस्तच. सैन्यामध्ये तर शिस्त कडक. शिस्त कुणालाही चुकत नसे. या लेखात लेखकाने ऊन, वारा, पाऊस याची तमा न बाळगता कर्तव्याला जागत राहायचे.

पूर्वीच्या काळी विद्यार्थ्यांनाही शिस्त पाळावी लागे. गुरूकुलाची कडक शिस्त कुणालाही चुकत नसते. या लेखात लेखकाने शिस्तीचे महत्त्व सांगितले आहे. मुंबईतील वरसोवा भागातील शिक्षकांनी शाळेतल्या विद्यार्थिनींचा निषेध करण्यासाठी रस्ता रोको केला.

या विद्यार्थिनीने शाळेच्या गणवेशात असताना अशोभनीय असे वर्तन केले. हे पाहून कर्तव्यतत्पर प्राचार्य अजय कौलयांनी तिच्या श्रीमुखात थप्पड मारली. मुलीच्या पालकांनी पोलिसांकडे तक्रार केली. अशा वेळी प्राचार्यांनी जागरूकपणे पालक, शिक्षक यांना बोलावून वस्तुस्थिती समजावून सांगितली. साऱ्यांनीच प्राचार्यांबरोबर जावून पोलिस स्टेशनमध्ये प्राचार्यांविषयी आदर व्यक्त केला. या घटनेमुळे लेखकाने विद्यार्थी जीवनात शिस्त किती महत्त्वाची असते याचे विवेचन केले आहे.

## ४५) सात लाख नापासांची चिंता

या लेखामधील भारतातील शिक्षण संस्कृतीचे वाभाडे काढले आहेत. म्हणूनच लेखक म्हणतात, "ब्रिटीशांचं चार भिंतीतील शिक्षण आता आखूड झालेल्या सदऱ्यासारखं वाटायला लागलं आहे."

महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, बापूजी साळुंखे, आंबेडकर, महर्षी कर्वे, आगरकर यांनी ग्रामीण भागापर्यंत शिक्षणाला पोहचविले. ज्ञानाचे दरवाजे त्यांनी बहुजन समाजाला उघडून दिले. पण सध्या शिक्षण संस्था व्यवसाय केंद्र बनल्या आहेत. राजकारणाबरोबर तो एक जोडधंदा बनलेला आहे. त्याचेच फलित म्हणून की काय सात लाख मुले नापास झाली आहेत. जीवनानुभवी शिक्षण हरवत चालले आहे. याविरूद्ध आपण आवाज उठवण्याची गरज आहे असे लेखकाला वाटते.

## ४६) कोण जगतो ? कोण मरतो ?

गंगाधर पानतावणे यांनी आपले संपूर्ण आयुष्य शिक्षण क्षेत्रात व्यतीत केले आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात वाढणाऱ्या अपप्रवृत्ती त्यांना अस्वस्थ करतात. पैशाच्या जोरावर शिक्षणसम्राट झालेल्या राजकीय पुढाऱ्यांच्या शिक्षण संस्थांवर आयकर खात्याने धाडी टाकल्यावर या शिक्षण सम्राटांचा होणारा थरथराट 'कोण जगतो? कोण मरतो?' या लेखात व्यक्त केला आहे.

शासनाला हाताशी धरून प्रचंड प्रमाणात कॅपिटेशन फीच्या नावाखाली लाखो रुपयांच्या देणग्या गोळा करणाऱ्या शिक्षणसम्राटांसाठी हा एक उद्योग आहे. म्हणून लेखकाला आठवतात त्या समाजप्रबोधनासाठी निस्पृह वृत्तीने स्थापन केलेल्या जोतिबा फुले, धोंडो केशव कर्वे, कर्मवीर अण्णा, पंजाबराव देशमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शिक्षण संस्था. या शिक्षण सम्राटांबरोबर देणग्या देणारे पालकही जबाबदार आहेत याची जाणीव लेखक करून देतात. या लेखामध्ये लेखकाची शिक्षण विषयक तळमळ, शिक्षण सम्राटावर धाडी ही वृत्तपत्रातील बातमी वाचल्यानंतर चिंतनाच्या स्वरूपात व्यक्त होते.

## ४७) धिग व्यापकं तमः

आपल्या भारतीय संस्कृतीत माता-पिता, अतिथी व गुरु यांना परमेश्वर मानलं जातं. शिक्षक समाजाला घडविणारा प्रमुख स्त्रोत आहे. जसे शिक्षण तसा समाज घडतो. भारतीय इतिहासात सर्व काळात नामवंत शिक्षक होऊन गेले आहेत. शिक्षक हा तत्त्वचिंतक मार्गदर्शक असतो. खऱ्या अर्थाने ते समाजाचे नेतृत्व करत असतात. अज्ञानातून ज्ञानाकडे व अंधारातून प्रकाशाकडे नेण्याचे पवित्र कार्य शिक्षकाद्वारे होत असते. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शिक्षकपदाला बहुमान मिळवून दिला. त्यांचे शिष्य भारताबरोबर भारताबाहेरही आहेत. सुसंस्कृत, ध्येयवादी व तत्त्वचिंतक होते म्हणून अशा या समाजशिक्षकाचा जन्मदिन शिक्षकदिन म्हणून साजरा केला जातो.

या शिक्षकदिनाच्या निमित्ताने शिक्षकाच्या कार्यकर्तृत्वाचा गौरव केला जातो. लेखक अशाच शिक्षक गौरव कार्यक्रमास उपस्थित राहतात आणि तेथे राजकीय नेत्याने शिक्षकांच्या वर्तना-विषयीचे काढलेले उद्‌गार ऐकून ते व्यतीत होतात. शिक्षण क्षेत्राला नैतिकतेचे अधिष्ठान देणारे शिक्षकच आपली नैतिकता विसरलेत की काय असे वातावरण वर्तमानपत्रातील बातम्यावरून वाटू लागले. गुरूला परब्रह्म म्हणायचं का ? असा लेखक प्रश्न विचारतात. शिक्षकावर समाजाची श्रद्धा असते. विश्वासार्हता असते. शिक्षकांकडे संवेदनशीलता असते. हे सर्व संपले की काय असा प्रश्न लेखकाला पडतो. एखाद्या अपवादात्मक घटनेने सर्वच क्षेत्र वाईट आहे असा समज करून घेऊ नये असेही लेखकाला वाटते. समाजातील जात, धर्म, सत्ता व श्रीमंतीने उन्मत झालेल्या गुन्हेगारांच्यामुळे ध्येयवादी शिक्षक घाबरून जातो. अशा या शिक्षण क्षेत्राची आणि शिक्षकांची ओळख डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्मदिनी म्हणजेच शिक्षकदिनानिमित्त करून दिली आहे.

## ४८) अठरा तास अभ्यास

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आदरांजली म्हणून सलग अठरा तास अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घटनेनंतर पानतावणे यांनी व्यक्त केलेली चिंतनात्मक प्रतिक्रिया आहे. अभ्यास हा अभ्यास असतो आणि प्रतिकात्मकता ही प्रतिकात्मकताच असते. अभ्यास कधीही प्रतिकात्मक होऊ शकत नाही. एक तास अभ्यास करायचा आणि इतर दिवशी काय ? या घटनेच्या निमित्ताने लेखकाने डॉ. बाबासाहेबांचे ग्रंथप्रेम, सलग अभ्यासाची बैठक आणि विद्‌वत्ता व एकाग्रता याची आठवण करून दिली आहे. पानतावणे म्हणतात महापुरुष एका रात्रीतून उगवत नसतात. प्रयास, पराकाष्ठा आणि निधीध्यास हे त्यांचे सांगाती असतात. चिंतन आणि मनन हीच त्यांची शक्तिस्थानं असतात. ग्रंथाच्या कुशीत विसावणं हा त्यांचा धर्म असतो.

अशा प्रकारे गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथामध्ये शिक्षण क्षेत्रातील समस्या, काही चांगल्या घटना, आदर्शवत शिक्षक या सर्वांच्या बरोबर शिक्षण क्षेत्राविषयीची जाणीव, कळकळ या सर्वांची ओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

## ४९) इतिहासाचे विस्मरण

नऊ ऑगस्ट भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारी दिन. नऊ ऑगस्ट फारसा गाजावाजा न करता निघून गेल्यानंतर या निमित्ताने लेखकाच्या मनात इतिहासाच्या आठवणी जाग्या होऊन तयार झालेला विचार कल्लोळ 'इतिहासाचे विस्मरण' या लेखात उमटलेला दिसतो. या निमित्ताने लेखकाने महात्मा गांधीपासून ते सावरकर, आंबेडकर यांच्या काळातील भूमिकासुद्धा जाता जाता सांगितल्या आहेत. ९ ऑगस्ट १९४२ च्या गवालिया टँक मैदानाच्या सभेत अरुणा असफअली यांनी तिरंगा ध्वज फडकविताना दाखविलेल्या धैर्याचे वर्णन इथे आले आहे. अशा अनेक स्वातंत्र्यसंग्रामातील नेत्यांच्या आठवणी जाग्या करतानाच लेखक सांगतात, 'राष्ट्राच्या जीवनात अनेक लढाया असतात. सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय लढाया असतात. सामाजिक आणि सांस्कृतिक लढाई स्वकियांशी करावी लागते. ती खूप अवघड आणि चिवट असते. हे सांगत असताना स्वातंत्र्याचे महत्त्व आणि इतिहासाचे स्मरण समाजाला राहणे आवश्यक असे वाटल्याचे लेखक म्हणतात, 'स्वातंत्र्य सहजासहजी मिळत नसतं. चोर पावलांनी ते येत नसतं. रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले? हे खरंच आहे. स्वातंत्र्योत्तर काळाला या कठोर इतिहासाचं स्मरण राहील का ?'

## ५०) बा अदब, बा मुलहिजा, होशियार !

या लेखात मंत्रीमंडळाला शंभर दिवस पूर्ण झाले म्हणून आनंदाचा सोहळा घेतला. त्याचा परामर्श या ठिकाणी घेतलेला आहे.

अंतर्गत वाद, वीज, शेती, आदिवासींचे प्रश्न यावर चर्चा होण्याऐवजी केवळ घोषणाबाजीच होताना दिसते. यावर या लेखात प्रकाश टाकला आहे. युती सरकार येऊन दोन्ही पक्ष एकमेकाला नमवायलाच बसले आहेत. विकासाच्या चर्चा होतच नाहीत. या वेदना गंगाधर पानतावणे यांना अस्वस्थ करतात. म्हणूनच गंगाधर पानतावणे यांनी यावर प्रकाश टाकलेला आहे.

## ५१) हिटलरचं निमंत्रण नाकारणारा महानायक

ज्या व्यक्तीच्यामुळे खेळ ओळखला अशा व्यक्ती अलौकीक क्रीडाकौशल्य असणाऱ्या असतात. भारतीय क्रीडेच्या प्रांगणात सूर्याप्रमाणे तळपणारा व नवोदितांसाठी आदर्श असणारा

खेळाडू म्हणजे भारतीय हॉकीतील चमत्कार मेजर ध्यानचंद. आपल्या हॉकीने साऱ्या जगाला आश्चर्यचकित करणारा महान खेळाडू म्हणून त्यांची ओळख संपूर्ण जगाला आहे. ऑलिंपिकच्या इतिहासात भारतीय हॉकी संघाने तीन वेळा सुवर्णपदक मिळवले यामध्ये प्रामुख्याने मेजर ध्यानचंद यांच महत्त्वपूर्ण योगदान आहे. भारताने एकूण ३३८ गोल केले. त्यामध्ये मेजर ध्यानचंद यांचे १३३ गोल होते. यावरून त्यांच्या खेळातील नैपुण्य लक्षात येते. त्यांच्याकडे कमालीची एकाग्रता, इच्छा आणि झुंजार वृत्ती होती. मेजर ध्यानचंद सेंटर फॉरवर्डला खेळत असत. त्यांच्याकडे चेंडूला गती व दिशा तसेच पासेस देण्याचे कौशल्य अफलातून होते. खेळाच्या दरम्यान अनेक प्रकारच्या संकटांना त्यांना सामोरे जावे लागत असे. पण त्यावरही ते मात करत असत. ऑस्ट्रेलियातील मॅचेसच्या वेळी ध्यानचंद यांचा खेळ पाहून क्रिकेटमधील महान खेळाडू डोनाल्ड ब्रॅडमन यांनी त्यांची पाठ थोपटली.

भारतीय हॉकील सुवर्ण वैभव प्राप्त करून देणारा हा महान खेळाडू जाज्वल्य राष्ट्रभक्त असणारा महानायक होता. वंशवादाचा पुरस्कार करणारा हिटलर हा देखील ध्यानचंदच्या खेळाने प्रभावित झाला होता. त्याने ध्यानचंदला बोलावून घेतले व त्याला आपल्या देशासाठी निमंत्रित करताना म्हणाला, 'ध्यानचंद तू आपल्या देशात परत जावून काय करणार आहेस ? तू जर आपल्या सैन्यात नाईक आहेस. तू आमच्या देशात रहा. मी जर्मनीतील सैन्याचा तुला फिल्ड मार्शल नेमतो.' त्यावर ध्यानचंदनी हिटलरला सांगितले, 'सर, फार मोठ्या कुटुंबाचा भार मला पेलावा लागतो. मला माझ्या घरी राहिलं पाहिजे.' आपल्या देशावर प्रचंड प्रेम करणारा हा गुणी खेळाडू, त्याने हुकूमशहा हिटलरचे बोलावणे नाकारले. या निस्वार्थी, देशप्रेमी व गुणी खेळाडूच्या स्वाभिमानाचा दाखला लेखकाने दिला आहे.

वरीलप्रमाणे गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथामध्ये सर्व क्षेत्रातील घटनांचा अन्वयार्थ उलगडून दाखवण्याचा प्रयत्न याठिकाणी केला आहे.

### ५२) जन्मशताब्दी

हा लेख विश्वविख्यात भदत्त आनंद कौसल्यायन यांच्या जीवनावर आहे. त्यांनी आपलं सारं आयुष्य दु:खितांच्या, पीडितांच्या व असहायांसाठी वेचले. त्यांच्या जन्मशताब्दी निमित्त हा लेख लिहिलेला आहे.

कौसल्यायन हे पंजाबमधील सुहाना या लहानशा खेड्यातील हरिनामदास नावाचे बालक लहानपणी अनेक अडचणींना तोंड देत परिस्थितीशी लढा देत होते. एके दिवशी राहूल सांस्कृत्यायन

यांच्याशी त्यांची भेट झाली. या भेटीने त्यांचे जीवनच बदलून गेले. महापंडित राहुलांनी हरिनामदासाला काषाय वस्त्रे दिली. भारतभ्रमण करण्याची आज्ञा दिली. पुढे श्रीलंकेत या विश्वनाथ भिक्षूचं आनंद कौसल्यायन झाले. त्यानंतर ते आसक्तीरहिन जीवन जगले.

त्यानंतर त्यांच्या जीवनाचा नवीन अध्याय सुरू झाला. वाचन,चिंतन, प्रवचन, मनन हीच त्यांच्या जीवनाची सार्थकता होती. त्यांची ग्रंथसंपदाही विपुल आहे. पुर्नजन्म, आत्मा, ईश्वर याविषयी विविध धर्माच्या संकल्पना यावर त्यांचे लेखन आहे. बौद्धसाहित्य इतिहास आणि संस्कृती, भगवद्गीता आणि धम्मपद यांचा तौलानिक अभ्यास, बौद्धधर्म और मार्क्सवाद, दर्शन वेद ते मार्क्सतक याशिवाय 'रिडल्स इन हिंदुइझम', 'दि अनटचेबल', 'दि बुद्ध अँड हिज धम्म' या ग्रंथाचे अनुवादही केले.

याशिवाय महात्मा गांधी, हरिवंशराय बच्चन, यशपाल, पंडित नेहरू, आंबेडकर यांच्याशी त्यांचे सख्य होते. २२ जून १९८८ ला त्यांचे महानिर्वाण झाले.

## ५३) ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या

'अर्थ आणि अन्वयार्थ' या पुस्तकातील अत्यंत महत्त्वाचा, दांभिकतेवर हल्ला करणारा हा लेख आहे.

भारत हा महान संस्कृती असणारा देश आहे. आठव्या शतकात केरळात जन्मलेल्या आदि शंकराचार्यांनी 'ब्रह्मं सत्यं जगन्मिथ्या' हे तत्त्वज्ञान साऱ्या जगाला दिले आहे. ब्रह्मं हे एकमेव सत्य आहे. शेष सारे मिथ्या आहे. हे तत्त्वज्ञान त्यांनी भारतीयांत रूजविले. त्याच शंकराचार्यांच्या परंपरेतील जयेंद्र सरस्वती शंकराचार्यांनी तमाम भारतीयांना मान खाली घालावी लागणारे वर्तन केले आहे. त्यांच्या स्त्रीलंपट स्वभाव अनेक उदाहरणातून उघड झाला आहे. राजकारण्यांप्रमाणे आपल्या मार्गातील काटेही त्यांनी सहजपणे दूर केले. अशा दांभिक साधूंना तुरुंगाचीच हवा मिळायला हवी. हा विचार येथे स्पष्ट केला आहे. विविध उदाहरणांच्या साहाय्याने दांभिकतेवर हल्ला केला आहे. साधूसंतांच्या नावाखाली दांभिक, भोंदूगिरी करणारे भ्रष्ट लोकही असतात याचे उदाहरण त्यांनी आपल्या लेखावरून दिले आहे.

## ५४) मागे परतोनि पाहे

दैनिक लोकसत्ता, औरंगाबाद या वृत्तपत्रामध्ये वर्षभर 'अर्थ आणि अन्वयार्थ' हे स्तंभलेखन लिहिल्यानंतर ३१ डिसेंबर या वर्षाच्या शेवटच्या दिवशी वाचकांचा निरोप घेण्यासाठी

लिहिलेला हा शेवटचा लेख आहे. वर्षभर घडलेल्या महत्त्वाच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक घटनांचा धावता आढावा घेत आणि त्यावर जाता जाता मिश्किल शैलीत प्रतिक्रिया व्यक्त करीत त्यांनी हा लेख लिहिलेला आहे. पानतावणेंना लेखनासाठी कोणताही विषय वर्ज्य नाही. त्यांची बौद्धिक झेप या सर्व विषयामध्ये सहज संचार करताना दिसते. क्रीडा, चित्रपट क्षेत्रातील मान्यवर त्यांची बेगडी सामाजिक सेवा, खोटे राजकारणी आणि प्रामाणिक कलावंत यांचा ते योग्य उल्लेख करताना दिसतात. कोणताही लेख लिहिताना गंगाधर पानतावणेंची सामाजिक जाणीव नेहमी जागृत असलेली दिसते. मानवतेचा शोध घेणारी त्यांची प्रतिभा 'अर्थ आणि अन्वयार्थ' मधील प्रत्येक लेखातून सामाजिक स्वास्थ्याला, मानवतेच्या सन्मानाला बाधा आणणाऱ्या प्रत्येक गोष्टींवर हल्ला करताना दिसतात.

स्तंभलेखनाच्या वैशिष्ट्यांनी परिपूर्ण असणारे 'अर्थ आणि अन्वयार्थ' मधील लेखन हे अनेक विषयांना स्पर्श करणारे आहे. रोजच्या जीवनात घडणाऱ्या घटना मागे सुद्धा केवढा विचार खोलवर करता येतो. हे या लेखावरून लक्षात येते. सर्व स्तरातील वाचकांची अभिरूची लक्षात घेऊन पानतावणे यांनी हे स्तंभलेखन केल्याने ते वाचनीय ठरते.

**निष्कर्ष**

१. 'अर्थ आणि अन्वयार्थ' हे दै. 'लोकसत्ता', औरंगाबाद या वृत्तपत्रातून वर्षभर सलग आणि नियमितपणे प्रसिद्ध झालेले स्तंभलेखन आहे. त्याला प्रसिद्ध होत असताना वाचकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला होता.

२. या ग्रंथामध्ये विविध विषयावरील ५४ लेख आहेत.

३. प्रत्येक लेख हा कोणत्यातरी तत्कालिक घटनेचा आधार घेऊन लिहिला आहे. त्यामुळे अनेक विषय त्यात येतात. परंतु आजच्या घटनेला लेखकाने दिलेल्या अनेक संदर्भामुळे लेखन विचारगर्भ व आकर्षक बनते.

४. स्तंभलेखनाच्या यशस्वितेसाठी विषयांची विविधता आवश्यक आहे.

५. या ग्रंथातील प्रत्येक लेख त्या त्या विषयासंबंधी परिपूर्ण माहिती देणारा आहे. त्यामुळे वाचकांना लेख वाचण्याचा आनंद आणि ज्ञान दोन्ही मिळतात.

६. प्रत्येक लेख हा नव्या विषयावर असल्याने वाचकांना लेखनात ताजेपणा जाणवत राहतो.

७. स्तंभलेखनाची व्यक्तिगत भूमिका व्यक्त करणे ही स्तंभलेखनाची गरज असते. परंतु पानतावणे यांनी स्वत:ची भूमिका मांडत असताना अट्टाहासाने न मांडता प्रामाणिकपणे मांडली आहे.

८. स्तंभलेखन हे वाचकाने सहजपणे वाचावे म्हणून पानतावणे यांनी लेखकाला कृत्रिम तत्वदर्शनाचे स्वरूप दिलेले नाही.

९. या ग्रंथातील प्रत्येक लेख त्या त्या विषयासंबंधी परिपूर्ण माहिती देणारा आहे.

१०. स्तंभलेखनात तात्पर्य अपेक्षित नसते. पानतावणे यांनी घटना आणि त्यावरील आपली भूमिका मांडत असताना कोठेही निष्कर्ष किंवा तात्पर्य वाचकांवर लादलेले नाही.

११. शब्दमर्यादा हे स्तंभलेखनाचे वैशिष्टय गंगाधर पानतावणे यांनी संभाळले असून प्रत्येक लेख दीड ते दोन वृत्तपत्रीय कॉलम (१५०० ते १८०० शब्दापर्यंत) असूनही तो शब्दपूर्ण व अर्थपूर्ण वाटतो. उलट अल्पक्षरात्वामुळे, शब्द मर्यादेमुळे लेख रेखीव व बांधेसुद दिसतात.

१२. अचूक शब्दयोजना हे वैशिष्ट्य सर्व लेखात दिसून येते.

१३. साधी, सोपी, सुटसुटीत वाक्यरचना आणि बोलीभाषा ही आवश्यक असते. ती सर्व लेखात दिसून येते.

१४. गंगाधर पानतावणे यांचे स्तंभलेखन हे वाचकांशी संवाद साधणारे आहे. हे लेखनाचे वैशिष्ट्य आहे.

१५. वैचारिक, संशोधनपर लेखन करणारे गंगाधर पानतावणे असले तरी त्यांच्या लेखनात लालित्य जाणवते.

१६. 'अर्थ आणि अन्वयार्थ' या ग्रंथातील प्रत्येक लेखामध्ये पानतावणे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रगटीकरण झालेले दिसते.

१७. पानतावणे यांचा वैज्ञानिक दृष्टिकोन, बुद्धीवादी मांडणी आणि पुरोगामी विचार आणि आंबेडकर वादावरील निष्ठा या सर्व गोष्टी त्यांच्या लेखनामधून व्यक्त होताना आढळते.

१८. सामाजिक, राजकीय, धार्मिक, वाङ्मयीन, सांस्कृतिक, क्रीडा अशा विविध लेखातून स्तंभलेखनाच्या दृष्टीने वैशिष्ट्य पूर्ण असे लेखन गंगाधर पानतावणे यांनी आपल्या 'अर्थ आणि अन्वयार्थ' ग्रंथातून केले आहे.

## संदर्भ सूची


१. कांबळेऋषिकेश (२००५) 'दलित साहित्य चळवळीचं प्रज्ञावंत उर्जा केंद्र : डॉ. गंगाधर पानतावणे' साहित्य सूची - जून, पृ. ८-१२

२. पवार, सुधाकर, येवलेकर अनंत (१९९१) 'मराठी भाषेची संवाद कौशल्ये - वृत्तपत्रे : संवादाचे स्वरूप', यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

३. भालेराव, इंद्रजीत (२००८) 'द. ता. भोसले यांचे ललित गद्य लेखन', नव अनुष्टुभ, वर्ष ३ - जुलै, ऑगस्ट - अंक ४, पृ.४१-४६

४. भोसले द. ता. (२००५) 'बदलते ग्रामीण जीवन : सहकार की स्वाहाकार', साहित्य सूची - दिवाळी अंक, पृ.२१६-२१९

५. तेंडुलकर विजय (१९७१) 'कोवळी उन्हे', नीलकंठ प्रकाशन, पुणे


-----x------